हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त
सर्व वाचक, जाहिरातदार,
वितरक व हितचिंतकांना
हार्दिक शुभेच्छा...!
तसेच स्वातंत्र्य सैनिक व हुतात्म्यांना
विनम्र अभिवादन...!

सायं दैनिक
# नांदेड वार्ता

रौप्य महोत्सव २५

www.nandedwarta.com www.nandedwarta.blogspot.com

। वर्ष २५ वे । अंक १ । गुरुवार दि. १७ सप्टेंबर २०२६ । नांदेड पोस्टपरवाना क्र.जी.-२/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ पाने ८ +४ । स्वागत मुल्य १० रु.

# मुक्तिसंग्रामाच्या स्मृती आणि आजच्या लोकशाहीची कसोटी

**महाराष्ट्रातील मराठवाडा हा प्रदेश हैदराबादच्या निजामाच्या संस्थानाचा भाग होता. भारतीय स्वातंत्र्य लढ्याची धग देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली असतानाही निजामाच्या राजवटीखालील जनतेला स्वातंत्र्य, लोकशाही आणि मूलभूत नागरी हक्कांपासून वंचित राहावे लागत होते. त्यामुळे मराठवाड्याच्या स्वातंत्र्याची कहाणी ही केवळ राजकीय सत्तांतराची नव्हे, तर सामान्य माणसाच्या स्वाभिमानासाठी झालेल्या संघर्षाची कहाणी आहे.**



१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; परंतु हैदराबाद संस्थान स्वतंत्र भारतात विलीन झाले नव्हते. निजाम मीर उस्मान अली खान यांच्या नेतृत्त्वाखाली संस्थान स्वतंत्र राहण्याच्या भूमिकेवर ठाम होते. या काळात मजलिस-ए-इत्तेहाद-उल-मुस्लिमीनचा प्रभाव वाढला आणि कासिम रझवीच्या नेतृत्वाखाली रझाकारांनी जनतेवर दहशत निर्माण केली. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य आणि लोकशाही हक्क यांच्यावर कठोर बंधने होती. या अन्यायाविरुद्ध जनतेच्या मनात असंतोष धुमसत होता. ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी, शिक्षक, कामगार आणि सामान्य नागरिकांनी विविध मार्गांनी प्रतिकार सुरू केला. अनेकांनी आपले सर्वस्व पणाला लावले. नांदेडसह संपूर्ण मराठवाड्यातील असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनी या लढ्यात सहभाग घेतला. काहींनी तुरुंगवास भोगला, काहींनी अमानुष छळ सहन केला, तर काहींनी मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करले.

हैदराबाद मुक्तिसंग्रामाला वैचारिक आणि संघटनात्मक दिशा देण्यात स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते. त्यांचे मूळ नाव व्यंकटेश भगवानराव खेडगीकर. त्यांच्या नेतृत्वाखाली हैद्राबाद संस्थानातील जनतेच्या लोकशाही हक्कांची चळवळ व्यापक झाली. मराठवाडा, तेलंगणा आणि कर्नाटकातील विविध भागांतील कार्यकर्त्यांनी या संघर्षात आपापल्या परीने योगदान दिले. या लढ्याचा इतिहास लिहिताना मोठ्या नेत्यांसोबतच गावोगावी संघर्ष करणाऱ्या असंख्य सामान्य कार्यकर्त्यांचे स्मरण करणे तितकेच आवश्यक आहे. नांदेड जिल्ह्यातील कल्लाळीसारख्या ठिकाणी घडलेल्या हत्याकांडांच्या आणि हुतात्म्यांच्या आठवणी आजही त्या काळातील क्रौर्याची साक्ष देतात. गोविंदराव पानसरे यांच्यासह अनेकांनी या संघर्षात बलिदान दिले. त्यांच्या त्यागामुळेच पुढील पिढ्यांना मुक्त वातावरणात श्वास घेण्याची संधी मिळाली. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले. या घटनेला आज आपण मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन म्हणून स्मरतो. हा दिवस केवळ उत्सवाचा नाही; तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. स्वातंत्र्यासाठी ज्यांनी रक्त सांडले, त्यांनी कोणत्या भारताचे स्वप्न पाहिले होते, हा प्रश्न प्रत्येक पिढीने स्वतःला विचारण्याची गरज आहे.

मुक्तिसंग्रामानंतर मराठवाड्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाला नवी दिशा मिळाली. भाषावार प्रांतरचनेनंतर मराठवाडा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग झाला. शिक्षणाच्या सुविधा वाढल्या, दळणवळणाची साधने विस्तारली, सिंचन प्रकल्प उभे राहिले, औद्योगिक विकासाला चालना

पंडित पवळे
नांदेड
मो.९८९०२३२९६२

मिळाली आणि तंत्रज्ञान सामान्य माणसापर्यंत पोहोचू लागले.

या परिवर्तनात अनेक लोकप्रतिनिधी,समाजसुधारक, शिक्षणप्रेमी आणि विचारवंतांचे योगदान राहिले. माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी राज्य आणि केंद्राच्या राजकारणात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळताना मराठवाड्याच्या विकासासाठी अनेक प्रकल्पांना चालना दिली. भाई केशवराव धोंडगे यांनी शिक्षण, समाजजागृती आणि वैचारिक चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण समाजमनावर प्रभाव टाकला. अशा नेतृत्वाने मराठवाड्याच्या विकासाच्या वाटचालीला दिशा दिली. मात्र आज १७ सप्टेंबरकडे पाहताना केवळ भूतकाळाचा गौरव करून चालणार नाही. मुक्तिसंग्रामाच्या मूल्यांची आजच्या लोकशाहीत कितपत जपणूक होत आहे, याचाही विचार करावा लागेल.

लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका नव्हेत. लोकांनी दिलेला कौल, संविधानिक मूल्ये, सार्वजनिक जीवनातील नैतिकता, पारदर्शकता आणि जनतेप्रती उत्तरदायित्व यांचा आदर करणे म्हणजे लोकशाही. पक्षांतर, सत्तासंघर्ष, राजकीय स्वार्थ, भ्रष्टाचार आणि सार्वजनिक जीवनातील नैतिक अधःपतन यामुळे सामान्य नागरिकाच्या मनात निर्माण होणारी निराशा चिंतेची बाब आहे. राजकीय मतभेद असणे स्वाभाविक आहे; परंतु लोकशाही संस्थांवरील विश्वास अबाधित ठेवणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. मुक्तिसंग्रामाच्या हुतात्म्यांनी केवळ निजामशाही संपविण्यासाठी संघर्ष केला नव्हता; त्यांनी स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार मिळविण्यासाठी लढा दिला होता. त्यामुळे आजही प्रत्येकाच्या हाताला काम, प्रत्येक कुटुंबाला सुरक्षित निवारा, शेतकऱ्याला पाणी, मुलांना दर्जेदार शिक्षण, सर्वांना सुलभ आरोग्यसेवा आणि तरुणांना रोजगाराच्या संधी मिळणे हीच खरी विकासाची कसोटी आहे. जात, धर्म, भाषा, प्रांत किंवा आर्थिक स्थिती यांच्या आधारावर समाजात दरी वाढता कामा नये. सामाजिक समता आणि आर्थिक न्याय या दोन्हींचा समतोल साधला पाहिजे. आरक्षण, सामाजिक मागासलेपणा, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या प्रश्नांकडे राजकीय संघर्षाच्या पलीकडे जाऊन मानवी दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. आज तंत्रज्ञानाच्या युगात आपण मोठी प्रगती केली आहे. मोबाईलपासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत नवे तंत्रज्ञान आपल्या जीवनाचा भाग झाले आहे. परंतु तंत्रज्ञानाची प्रगती माणुसकीच्या प्रगतीसोबत झाली तरच तिचे खरे सार्थक आहे. विज्ञानाची दृष्टी, संविधानाची मूल्ये आणि समाजहिताची भावना यांचा संगम घडवणे ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे.

राष्ट्र म्हणजे मी आणि मी म्हणजे राष्ट्र ही भावना प्रत्येक नागरिकाच्या मनात रुजली पाहिजे. जगा आणि जगू द्या या विचारातून सामाजिक सलोखा निर्माण झाला पाहिजे. अधिकारांची जाणीव असतानाच कर्तव्यांची जाणीवही असली पाहिजे. शासनाकडून अपेक्षा ठेवताना नागरिक म्हणून आपण काय योगदान देतो, याचाही विचार झाला पाहिजे. आज १७ सप्टेंबर २०२६ रोजी मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या स्मृती जाग्या करताना एक प्रश्न मनाला अस्वस्थ करतो. ज्या स्वातंत्र्यासाठी हुतात्म्यांनी प्राण दिले, त्या स्वातंत्र्याला आपण सुराज्याचे रूप देऊ शकलो आहोत का? या प्रश्नाचे उत्तर केवळ शासनाने किंवा लोकप्रतिनिधींनी द्यायचे नाही. त्याचे उत्तर प्रत्येक नागरिकाच्या आचरणातून मिळाले पाहिजे.

स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि लोकशाही या संविधानिक मूल्यांची जपणूक करून आपण अधिक सक्षम, संवेदनशील आणि जबाबदार समाज उभा केला, तरच मराठवाडा मुक्तिसंग्रामातील ज्ञात-अज्ञात हुतात्म्यांना ती खरी आदरांजली ठरेल.मुक्तिसंग्रामाच्या स्मृती केवळ इतिहासाच्या पानांत न राहता आपल्या वर्तमानाला दिशा देऊ देत आणि भविष्याला प्रकाश देऊ देत, हीच १७ सप्टेंबरची खरी शपथ!






संपादकीय

## ...प्रवास दोन तपांचा!

भारतीय संस्कृतीत बारा वर्षाला एक तप म्हटले जाते. काळाच्या ओघात २४ वर्षे कधी सरली, हे कळलेही नाही. मात्र या २४ वर्षांच्या प्रवासाकडे मागे वळून पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. वृत्तपत्राचा खरा आधार कागद, शाई किंवा यंत्रणा नसते; त्याचा खरा आधार असतो तो वाचकांचा विश्वास. 'सायं दैनिक नांदेड वार्ता'ने आज वाचकांच्या विश्वासाची दोन तपे पूर्ण करून २५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. हा टप्पा केवळ वर्धापनदिनाचा नाही, तर विश्वासाच्या या नात्याचा उत्सव आहे.१७ सप्टेंबर हा 'सायं दैनिक नांदेड वार्ता'साठी विशेष दिवस. त्याचबरोबर हा दिवस मराठवाड्याच्या इतिहासातही अढळ स्थान असलेला आहे. १९४८ मध्ये याच दिवशी हैदराबाद मुक्ती संग्रामाच्या निर्णायक संघर्षाला यश मिळाले आणि मराठवाडा भारतीय लोकशाहीच्या प्रवाहात सामील झाला. स्वातंत्र्यासाठी असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी केलेला त्याग, संघर्ष आणि बलिदान या दिवशी स्मरणात येते. त्यामुळे वर्धापनदिन हा आमच्यासाठी उत्सवाबरोबरच संघर्षाच्या परंपरेचे स्मरण करून देणारा संकल्पदिन आहे. निजामशाहीच्या जुलमाविरुद्ध लढणाऱ्या या भूमीत कॉ. अनंतराव नागापूरकर यांच्या संघर्षाची सुरुवात स्वातंत्र्य लढ्याच्या काळातच झाली. हैदराबाद येथे शिक्षण घेत असताना ते भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाशी जोडले गेले आणि वंदे मातरम् चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; मात्र हैदराबाद संस्थान स्वतंत्र भारतात विलीन झाले नव्हते. निजामाची राजवट कायम असल्याने हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्य सैनिकांना पुन्हा स्वातंत्र्यासाठी स्वतंत्र लढा उभारावा लागला. या संघर्षातही कॉ. अनंतराव नागापूरकर यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. कामगार, कष्टकरी, शेतकरी आणि शेतमजूर यांना संघटित करून त्यांच्या हक्कांसाठी संघर्षाची वेगळी ओळख निर्माण केली. निजामशाहीविरुद्धच्या लढ्यात तुरुंगवास आणि कठोर शिक्षाही भोगली. स्वातंत्र्यानंतरही त्यांचा संघर्ष थांबला नाही; शेतकरी-कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य झोकून दिले.हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर यांनीही निजामशाहीविरुद्धच्या लढ्यात धाडसी भूमिका बजावली. निजामाच्या करोडगिरी नाक्यावर हल्ला करून त्यांनी निजामाच्या सैनिकांना ठार केले. अवघ्या १८ व्या वर्षी निजामाचे सैन्य असलेल्या रझाकारांच्या गोळीबारात ते धारातीर्थी पडले. त्यांचे बलिदान म्हणजे या संघर्षाची सर्वोच्च किंमत सांगणारे आणि पुढील पिढ्यांना अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देणारे आहे. त्यांचा वारसा म्हणजे अन्यायापुढे न झुकण्याची आणि जनतेच्या हक्कांसाठी शेवटपर्यंत उभे राहण्याची प्रेरणा. याच विचारधारेतून 'सायं दैनिक नांदेड वार्ता'ची पत्रकारिता घडत गेली. गेल्या २४ वर्षांत या दैनिकाने केवळ घटना सांगण्याचे काम केले नाही, तर घटनेमागचा माणूस शोधण्याचा प्रयत्न केला. शेतकरी, कामगार, कष्टकरी, वंचित आणि अन्यायग्रस्तांच्या प्रश्नांना शब्द देताना समाजातील दुर्बल घटकांचा आवाज सत्तेच्या आणि व्यवस्थेच्या कानावर पोहोचवण्याची भूमिका घेतली. पत्रकारितेची खरी ताकद प्रसिद्धीत नसते; ती विश्वासार्हतेत असते. एखादी बातमी किती मोठी झाली यापेक्षा ती किती सत्य आणि समाजोपयोगी होती, हे अधिक महत्त्वाचे. सत्तेच्या जवळ राहणे सोपे असते; पण सत्तेला प्रश्न विचारण्याचे धैर्य राखणे कठीण असते. दबाव, प्रलोभन, जाहिरातींची गरज किंवा कोणत्याही प्रकारचे आकर्षण असले तरी लेखणीची दिशा जनतेपासून दूर जाऊ नये, हीच पत्रकारितेची खरी कसोटी आहे. आजच्या काळात ही कसोटी आणखी कठीण झाली आहे. समाजमाध्यमांमुळे माहितीचा वेग प्रचंड वाढला आहे. एका क्षणात बातमी हजारो लोकांपर्यंत पोहोचते. मात्र वेगाने पोहोचणारी प्रत्येक गोष्ट सत्य असेलच असे नाही. अफवा, अर्धसत्य आणि सनसनाटीपणाच्या गर्दीत वस्तुनिष्ठ आणि विश्वासार्ह पत्रकारितेचे महत्त्व त्यामुळेच वाढले आहे. माहिती देणे सोपे आहे; विश्वास निर्माण करणे कठीण आहे. हा विश्वास २४ वर्षे जपता आला, हीच 'सायं दैनिक नांदेड वार्ता'च्या प्रवासाची सर्वात मोठी कमाई आहे. वर्धापनदिनाच्या या क्षणी मागील वाटचालीचा अभिमान असला, तरी त्यापेक्षा पुढील वाटचालीची जबाबदारी मोठी आहे. २५ वे वर्ष म्हणजे नव्या संकल्पाचे वर्ष. तंत्रज्ञान बदलणार, माध्यमांची साधने बदलणार, वाचकांच्या अपेक्षा बदलणार; पण पत्रकारितेची मूलभूत मूल्ये बदलता कामा नयेत. सत्याला प्राधान्य, अन्यायाला विरोध आणि जनतेच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवणे, ही दिशा कायम राहिली पाहिजे. आज समाजासमोर बेरोजगारी, महागाई, शेतीची संकटे, कामगारांचे प्रश्न, शिक्षण, आरोग्य, सामाजिक विषमता आणि भ्रष्टाचारासारखी आव्हाने आहेत. या प्रश्नांकडे केवळ बातमी म्हणून नव्हे, तर समाजाच्या भविष्याशी जोडलेले प्रश्न म्हणून पाहणे आवश्यक आहे. वृत्तपत्राने लोकांच्या मनातील अस्वस्थतेला शब्द द्यावेत आणि त्यांच्या आशांना दिशा देण्याचे काम करावे.२४ वर्षे पूर्ण झाली म्हणून हा प्रवास संपलेला नाही; उलट २५ व्या वर्षात त्याची खरी परीक्षा सुरू होत आहे. दोन तपांचा विश्वास पुढील काळात अधिक दृढ करायचा आहे. वाचकांनी दिलेले प्रेम आणि विश्वास हीच आमची ऊर्जा आहे. त्याला उत्तर देण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अधिक प्रामाणिक, निर्भीड आणि लोकाभिमुख पत्रकारिता. हैदराबाद मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांनी अन्यायाविरुद्ध संघर्षाची मशाल पेटवली. त्या मशालीचा प्रकाश आजच्या लोकशाहीत लेखणीच्या रूपाने पुढे नेणे ही काळाची गरज आहे. 'सायं दैनिक नांदेड वार्ता'च्या २५ व्या वर्षाची सुरुवात म्हणून आज एकच शब्द महत्त्वाचा आहे, विश्वास. वाचकांचा विश्वास जपायचा. सत्याचा आवाज बुलंद ठेवायचा. अन्यायाला प्रश्न विचारायचे. आणि जनतेच्या प्रश्नांपासून कधीही दूर जायचे नाही. दोन तपांचा विश्वास हाच आमचा ठेवा; पंचविसावे वर्ष हा नव्या संकल्पाचा प्रारंभ! 'सायं दैनिक नांदेड वार्ता'च्या या प्रवासात वाचकांची साथ अशीच कायम राहो आणि जनतेच्या आशा-आकांक्षांना शब्द देणारी ही लेखणी अधिक सामर्थ्याने पुढे चालत राहो,हीच वर्धापनदिनानिमित्त अपेक्षा.

# मराठवाडा मुक्ती संग्राम



## स्वातंत्र्य, लोकशक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरवशाली अध्याय

**भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले; मात्र तत्कालीन हैदराबाद संस्थानातील जनतेला भारतीय संघात सहभागी होण्यासाठी आणखी तेरा महिने प्रतीक्षा करावी लागली. या संस्थानात आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा, तेलंगणाचा प्रदेश आणि कर्नाटकातील काही भागांचा समावेश होता. त्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस केवळ एका प्रदेशाच्या मुक्तीचा दिवस नसून, भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणून स्मरणात राहिला आहे.**

प्रवीण टाके
उपसंचालक
विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

देशाला स्वातंत्र्य मिळाले; पण हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले नव्हते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश सत्ता संपुष्टात आल्यानंतर संस्थानांच्या भारतात विलिनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खान यांनी हैदराबाद स्वतंत्र अस्तित्वात ठेवण्याची भूमिका घेतली. भारत सरकार आणि हैदराबाद संस्थान यांच्यात वाटाघाटी सुरू राहिल्या. काही काळासाठी स्थिती कायम ठेवण्याचा करार अर्थात 'जैसे थे' करार (स्थैर्य करार) करण्यात आला. मात्र संस्थानातील राजकीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत गेली. गावागावांत रजाकारांविरुद्ध संघर्ष वाढत गेला.हैदराबाद संस्थानातील जनतेमध्ये नागरी हक्क, जबाबदार शासन आणि भारतीय संघात सहभागी होण्याची मागणी अधिक तीव्र होत होती. या लोकचळवळीला हैदराबाद स्टेट काँग्रेस, महाराष्ट्र परिषद तसेच विविध सामाजिक व राष्ट्रीय विचारांच्या संघटनांनी दिशा दिली.

**मराठवाड्यात जागृतीची बीजे**

मराठवाड्यातील मुक्ती संग्राम अचानक सुरू झालेला नव्हता. त्यामागे अनेक वर्षांची सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृती होती. राष्ट्रीय विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध ठिकाणी शाळा, वाचनालये आणि सामाजिक संस्था कार्यरत होत्या. परभणीचे नूतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भुवन विद्यालय, हिप्परगा येथील शारदा मंदिर, अंबाजोगाईचे योगेश्वरी विद्यालय, उदगीरचे श्यामलाल विद्यालय, लातूरमधील ज्युबिली विद्यालय, बीडचे चंपावती विद्यालय, नांदेडचे प्रतिभा निकेतन आदी संस्थांनी राष्ट्रीय जागृतीच्या कार्याला हातभार लावला. या कार्याला स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांची प्रेरणा लाभली.

१९३८ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेने या चळवळीला संघटित राजकीय स्वरूप मिळाले. निजाम सरकारने या संघटनेवर बंदी घातल्यानंतर सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्यात आला. मुक्तिसंग्रामासाठी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवी नारायण रेड्डी, देवीसिंह चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंह नाईक, विजयेंद्र काबरा, बाळासाहेब परांजपे यांनी लढ्याचे नेतृत्व केले. काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्दन होर्टीकर गुरुजी, सूर्यभान पवार, आ. कृ. वाघमारे, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातनेश्वरकर अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास अजरामर केला आहे. गावागावातील संघर्षांमध्ये अनेक अनामिक वीरांनी आपले बलिदान दिले आहे. १९३८ च्या सत्याग्रहातील नांदेडच्या कार्यकर्त्यांचा सहभाग या लढ्यात विशेषत्वाने नोंदविला गेला आहे.

**आठ जिल्ह्यांची व्यापक लोकचळवळ**

आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली हे आठ जिल्हे आहेत. तत्कालीन काळातील प्रशासकीय सीमांमध्ये काही बदल झाले असले तरी या संपूर्ण मराठी भाषिक प्रदेशाने हैदराबाद मुक्तीच्या लढ्यात महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. मराठवाड्याचा संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश भारतीय संघात विलीन होण्यासाठी आतुर होता.बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचे प्रमुख केंद्र होते. हैदराबाद मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी योगदान दिले आणि अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा झाले.या व्यापक लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा आणि पी. एच. पटवर्धन यांसारख्या नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली.लढ्याचे स्वरूप केवळ एका शहरापुरते मर्यादित नव्हते. नांदेड, परभणी, सेलू, जालना, अंबड, बीड, उस्मानाबाद, लातूर, अंबाजोगाई, उदगीर, उमरी, धर्माबाद, कंधार, देगलूर आदी भागांत विविध स्वरूपाचे सत्याग्रह, जनजागृती आणि प्रतिकाराच्या चळवळी झाल्या.

**दडपशाहीला लोकशक्तीचा प्रतिकार**

स्वातंत्र्याच्या मागणीला तत्कालीन सत्तेकडून विरोध झाला. आंदोलनकर्त्यांना अटक, कारावास आणि विविध प्रकारच्या दडपशाहीला सामोरे जावे लागले. परिस्थिती अधिक गंभीर झाल्यानंतर रजाकारांच्या हिंसक कारवायांमुळे सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढल्या. लोकशाही, नागरी हक्क आणि जबाबदार शासनासाठी जनतेने निकराचा संघर्ष केला. प्रशासनाच्या नोंदीनुसार, १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत नांदेड, वैजापूर, गंगापूर, परभणी, सेलू, उस्मानाबाद, बीड, अहमदपूर, जालना आणि अंबड यांसारख्या ठिकाणी सत्याग्रहींना कारावास भोगावा लागला. या आंदोलनामुळे हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्यवादी शक्ती अधिक संघटित झाल्या. स्वातंत्र्याच्या लढ्यातील या सहभागाने मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याला आणखी गती मिळाली.

**निजामाची आणि भारताची भूमिका**

भारत सरकारने हैदराबाद प्रश्न सोडविण्यासाठी सुरुवातीला संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारला. मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याने भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो' सुरू झाले. भारतीय सैन्याच्या कारवाईसमोर हैदराबाद संस्थानाच्या सैन्याचा प्रतिकार फार काळ टिकला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती स्वीकारली आणि हैदराबाद राज्य भारतीय संघात सहभागी झाले. केंद्र सरकारच्या अधिकृत नोंदीत या प्रक्रियेला भारताच्या राजकीय एकात्मतेतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून अधोरेखित केले आहे.

स्वातंत्र्योत्तर भारताने संस्थानांचे एकत्रीकरण करताना संवाद, राजनैतिक प्रयत्न आणि आवश्यक त्या वेळी निर्णायक कारवाई यांचा समन्वय साधला. हैदराबादच्या प्रश्नावर भारत सरकारने सुरुवातीला संवाद व राजनैतिक प्रयत्नांचा मार्ग स्वीकारला; मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यानंतर निर्णायक लष्करी कारवाई करण्यात आली. हैदराबादचा संघर्ष आणि विलीनीकरण हा एकसंघ भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय ठरला.

भारताच्या मध्यभागी स्वतंत्र राज्याचे अस्तित्व कायम राहिल्यास निर्माण होणारी राजकीय व प्रशासकीय गुंतागुंत किती गंभीर ठरली असती, याची कल्पना आजही करता येते. भारताच्या राजकीय एकात्मतेच्या दृष्टीने ही कारवाई किती महत्त्वाची होती, हे त्यानंतरच्या घडामोडींवरून स्पष्ट होते. त्यामुळे संस्थानांच्या विलीनीकरणासाठी झालेला हा संघर्ष भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम ठरला आहे.

**भाषिक वेगळेपणही लक्षणीय ठरले**

१९४८ मध्ये भारतीय संघात समाविष्ट झालेले हैदराबाद संस्थान आज एकाच राज्याचा भाग नाही. त्यातील मराठवाडा महाराष्ट्रात, तेलुगू भाषिक प्रदेश तेलंगणात आणि कन्नड भाषिक प्रदेश कर्नाटकात समाविष्ट झाला. तत्कालीन हैदराबाद राज्यात आजच्या तेलंगणासह मराठवाडा आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांचा समावेश होता.भाषावार प्रांतरचनेनंतर मराठवाडा १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचा भाग झाला. अशा प्रकारे १९४८ मध्ये भारतीय संघाशी जोडलेला हा प्रदेश पुढे आधुनिक महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि सामाजिक विकासाचा अविभाज्य घटक बनला.

**१७ सप्टेंबर : मुक्ती संग्राम दिन**

महाराष्ट्र शासनाने ४ मे २००१ रोजी शासन निर्णयाद्वारे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा विभागात 'मुक्ती संग्राम दिवस' म्हणून कायमस्वरूपी साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात शासकीय पातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत हा दिवस साजरा केला जातो. विभागीय मुख्यालय असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्याची परंपरा आहे. इतर जिल्ह्यांतही पालकमंत्री किंवा नियुक्त मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते.

छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री ध्वजारोहण करतात, कारण हे शहर मराठवाड्याचे विभागीय मुख्यालय असून मुक्ती संग्रामाच्या स्मृतींशी जोडलेले प्रमुख केंद्र आहे. स्मृतिस्तंभाला अभिवादन, हुतात्म्यांना श्रद्धांजली, ध्वजारोहण, मानवंदना आणि विविध शासकीय कार्यक्रमांद्वारे या इतिहासाचे स्मरण केले जाते. महाराष्ट्र शासन मुक्ती संग्रामाचा इतिहास पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १०० कोटी रुपये खर्चून छत्रपती संभाजीनगर येथे स्मारक उभारत आहे.

**इतिहासाचा सन्मान, भविष्याची प्रेरणा**

मराठवाडा मुक्ती संग्राम हा केवळ भूतकाळातील संघर्ष नाही. तो लोकशाही, स्वातंत्र्य, नागरी हक्क, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकसहभागाच्या मूल्यांची जाणीव करून देणारा इतिहास आहे. या लढ्यात ज्ञात-अज्ञात असंख्य स्वातंत्र्यसैनिक, कार्यकर्ते, महिला, युवक आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिले. त्यांच्या त्यागामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्याच्या भारतीय संघात विलिनीकरणाचा मार्ग मोकळा झाला.

१७ सप्टेंबर रोजी तिरंगा अभिमानाने फडकताना त्या काळातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण होते. हा दिवस अन्यायाविरुद्धच्या लोकशाही मूल्यांच्या आणि भारताच्या एकात्मतेच्या विजयाचे स्मरण करून देतो.

मराठवाड्याने भारताच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान इतिहासाच्या पानांवर अढळ आहे. छत्रपती संभाजीनगरपासून नांदेडपर्यंत, जालन्यापासून लातूरपर्यंत, बीडपासून धाराशिवपर्यंत आणि परभणीपासून हिंगोलीपर्यंत या भूमीने स्वातंत्र्याची आस जपली आणि राष्ट्रीय प्रवाहात सहभागी होण्यासाठी संघर्ष केला. त्या ज्ञात-अज्ञात वीरांना आणि वीरांगनांना कृतज्ञ अभिवादन करणे आणि त्यांच्या त्यागातून लोकशाही व राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हीच मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची खरी प्रेरणा आहे.१७ सप्टेंबर हा त्यामुळे केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो मराठवाड्याच्या देशभक्तीला, लोकशक्तीला आणि अखंड भारताच्या एकात्मतेला अभिवादन करण्याचा दिवस आहे.




श्रेयनामावली
**मुख्य संपादक :** प्रदीप अनंतराव नागापूरकर,
**सहसंपादक :** अविनाश पंढरीनाथ पाटील
**मांडणी व सजावट :** लहु राठोड (नांदेड)
**विशेष सहकार्य :** संजय लष्करे, नागेश डोंगरे, एन.टी.कांबळे केशव नवरे.
**जाहिरात संकलन :** बी.एल. कागणे (किनवट), सरफराज दोसाणी (माहूर), नरसिंग अनमवार (देगलूर), दिगांबर वाघमारे (कंधार), संजय झगडे (धर्माबाद), गणेश कंदुरके (नायगाव), त्रिरत्न सवई (उमरी), एस.एन. कोंडावार (कुंडलवाडी), जयराम वने (मुदखेड)

सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२११९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४



# मराठवाड्यात शिक्षण आहे, पण गुणवत्तेचे काय ?

**मराठवाड्याच्या विकासाची चर्चा सुरू झाली की, सिंचन,दुष्काळ, शेती, बेरोजगारी, स्थलांतर आणि उद्योगांची कमतरता हे विषय हमखास पुढे येतात. मात्र या सर्व प्रश्नांच्या मुळाशी जाऊन पाहिले तर एक प्रश्न वारंवार समोर येतो–आपण मराठवाड्याला दर्जेदार शिक्षण देण्यात कुठे कमी पडलो? आज मराठवाड्यात शाळा नाहीत असे नाही. महाविद्यालये नाहीत असेही नाही. यांचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रापेक्षा कमी असेल परंतु कांही प्रमाणात का होईना विद्यापीठे, तांत्रिक संस्था, खासगी शिक्षणसंस्था आणि विविध शासकीय योजना आहेत. तरी, पण मग मग प्रश्न उरतो तो वेगळा–या सर्व व्यवस्थेतून विद्यार्थी प्रत्यक्षात किती शिकतो? कारण विद्यार्थ्याला शाळा – महाविद्यालयात प्रवेश मिळणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.**

**डॉ. विकास विनायकराव सुकाळे**
**प्राचार्य**
**पीपल्स कॉलेज, नांदेड**

२०११ च्या जनगणनेनुसार मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांची साक्षरता महाराष्ट्राच्या एकूण पातळीपेक्षा कमी होती. जालना जिल्ह्याची साक्षरता ७१.५२ टक्के, परभणीची ७३.३४ टक्के, नांदेडची ७५.४५ टक्के आणि लातूरची ७७.२६ टक्के होती. छत्रपती संभाजीनगरची साक्षरता ७९.०२ टक्के होती. या आकडेवारीला आजची स्थिती मानता येणार नाही; पण मराठवाड्याने दीर्घकाळ अनुभवलेल्या शैक्षणिक दरीचे ते महत्त्वाचे प्रतिबिंब आहे. याहून चिंताजनक बाब म्हणजे महिला आणि पुरुष साक्षरतेतील अंतर. जालना जिल्ह्यात २०११ मध्ये पुरुष साक्षरता ८१.५३ टक्के असताना महिला साक्षरता केवळ ६०.९५ टक्के होती. परभणीतही पुरुष साक्षरता ८२.६४ टक्के आणि महिला साक्षरता ६३.६३ टक्के होती. ही केवळ आकडेवारी नाही. तिच्यामागे एक सामाजिक वास्तव दडलेले आहे.

मराठवाड्याच्या शिक्षणाचा प्रश्न समजून घेताना दुष्काळाकडे केवळ शेतीच्या समस्येच्या रूपात पाहता येणार नाही. दुष्काळाचा परिणाम कुटुंबाच्या उत्पन्नावर होतो; उत्पन्न कमी झाले की रोजगाराचा प्रश्न निर्माण होतो; रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते आणि शेवटी त्याचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर होतो.म्हणून मराठवाड्याच्या शिक्षणाचे धोरण हे दुष्काळाच्या वास्तवापासून वेगळे ठेवता येणार नाही. आजही आपण मुलगा शाळेत का येत नाही? असा प्रश्न विचारतो. त्याऐवजी तो शाळेत येऊ शकत नाही अशी परिस्थिती का निर्माण झाली? हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.यासाठी स्थलांतरित कुटुंबातील मुलांसाठी शिक्षण सातत्य योजना, हंगामी वसतिगृहे, वाहतूक सुविधा आणि पूरक अध्यापन आवश्यक आहे.

शहरी विद्यार्थ्याला चांगली शाळा, खासगी शिकवणी, इंटरनेट, संगणक, ग्रंथालय, स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन आणि विविध शैक्षणिक उपक्रम सहज उपलब्ध होतात. ग्रामीण विद्यार्थ्याला मात्र यातील अनेक सुविधा मिळवण्यासाठी तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागते. मग आपण दोन्ही विद्यार्थ्यांची परीक्षा एकाच पातळीवर घेतो आणि म्हणतो–संधी सर्वांना समान आहेत. खरंच आहेत का?

समान परीक्षा म्हणजे समान संधी नव्हे ? ग्रामीण विद्यार्थ्याला समान संधी देण्यासाठी त्याला काही बाबतीत अधिक आधार द्यावा लागेल. प्रत्येक तालुक्यात डिजिटल लर्निंग सेंटर, ई–लायब्ररी, स्पर्धा परीक्षा अभ्यासिका, विज्ञान प्रयोगशाळा आणि करिअर मार्गदर्शन केंद्र उभारणे ही काळाची गरज आहे

शाळा–न महाविद्यालय आहे; पण शिकणे आहे का? शिक्षणाच्या गुणवत्तेबाबतचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न याच ठिकाणी आहे.विद्यार्थ्याने एखादा धडा पाठ केला, परीक्षेत लिहिला आणि गुण मिळवले म्हणजे त्याने तो विषय समजून घेतला असे होत नाही.गणिताचे सूत्र पाठ असते; पण ते प्रत्यक्ष समस्येत वापरता येत नाही. विज्ञानातील व्याख्या पाठ असतात; पण प्रयोग करता येत नाही. इंग्रजीचे शब्द माहीत असतात; पण संवाद साधता येत नाही.ही स्थिती बदलायची असेल तर शिक्षणाची दिशा बदलावी लागेल. पाठांतरापासून आकलनाकडे, आकलनापासून प्रयोगाकडे आणि प्रयोगापासून समस्या सोडवणुकीकडे शिक्षण नेले पाहिजे. गावातील पाण्याची समस्या, शेतीतील खर्च, पावसाचे प्रमाण, पीक उत्पादन, बाजारभाव–हे सर्व विद्यार्थ्यांसाठी गणित, विज्ञान, अर्थशास्त्र आणि भूगोल शिकण्याची जिवंत प्रयोगशाळा बनू शकते. शिक्षण पुस्तकातून बाहेर आले तरच विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रवेश करेल

शिक्षणाचा पाया प्राथमिक शाळेतच ! मराठवाड्यातील शिक्षण संस्थेतील अनेक मुलांना इयत्ता तिसरी–चौथीपर्यंत व्यवस्थित वाचता– लिहिता किंवा मूलभूत गणित करता येत नाही यामुळे पुढील शिक्षणाचा पाया कमकुवत राहतो. यानंतर विद्यार्थी पुढील वर्गात जात राहतो; पण त्याची अडचण त्याच्यासोबत पुढे जाते. ही समस्या फक्त विद्यार्थ्यांची नसते. ती संपूर्ण शिक्षण व्यवस्थेची असते. प्रत्येक मुलाची शिकण्याची पातळी नियमित तपासून, मागे राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष पूरक अध्यापन करणे आवश्यक आहे.

शिक्षक हा व्यवस्थेचा केंद्रबिंदू ! शिक्षणाच्या गुणवत्तेची चर्चा करताना आपण अनेकदा इमारती, संगणक, स्मार्ट बोर्ड आणि डिजिटल साधनांबद्दल बोलतो. पण शेवटी वर्गात विद्यार्थ्यासमोर उभा राहणारा शिक्षकच शिक्षणाचा मुख्य दुवा असतो. शिक्षकांची संख्या पुरेशी असणे आवश्यक आहेच; परंतु त्याहून महत्त्वाचे म्हणजे शिक्षक विषयात सक्षम आणि आधुनिक अध्यापन पद्धती वापरणारे असले पाहिजेत. गणित, विज्ञान आणि इंग्रजीसारख्या विषयांसाठी विशेष प्रशिक्षित शिक्षकांची उपलब्धता ग्रामीण भागात वाढवावी लागेल. शिक्षकांना केवळ प्रशिक्षण देऊन काम भागणार नाही. त्यांना सतत शैक्षणिक मार्गदर्शन, सहकारी शिक्षकांचा आधार आणि अनावश्यक प्रशासकीय कामातून मुक्त वेळ मिळाला पाहिजे. मराठवाड्यातील महिला साक्षरतेची आकडेवारी आपल्याला आरसा दाखवते. मुलींच्या शिक्षणातील अडथळे अनेकदा शाळेच्या चार भिंतीबाहेर असतात–शाळेचे अंतर, सुरक्षित वाहतूक, स्वच्छतागृहांचा अभाव, घरकामाची जबाबदारी, आर्थिक अडचण किंवा सामाजिक मानसिकता. म्हणून मुलींच्या शिक्षणासाठी केवळ शिष्यवृत्ती पुरेशी नाही. सुरक्षित प्रवास + स्वच्छतागृह + वसतिगृह + आर्थिक मदत + पालकांची मानसिकता बदलणे या सर्व गोष्टी एकत्र कराव्या लागतील. कारण एका मुलीचे शिक्षण थांबते तेव्हा केवळ एका विद्यार्थिनीचे नुकसान होत नाही; पुढील पिढीच्या मानवी विकासाची एक संधी कमी होते.

ऊसतोडणी, बांधकाम, वीटभट्टी किंवा इतर हंगामी रोजगारासाठी कुटुंब स्थलांतरित होते तेव्हा मुलाचेही शिक्षण स्थलांतरित होते. शाळा बदलते. अभ्यासक्रम बदलतो. मित्र बदलतात. कधी परीक्षा चुकते. कधी शाळाच सुटते.आपल्या शिक्षण व्यवस्थेने या वास्तवाचा स्वीकार केला पाहिजे. विद्यार्थ्याच्या शिक्षणाची डिजिटल किंवा पोर्टेबल नोंद असावी. तो कोणत्याही जिल्ह्यात किंवा राज्यात गेला तरी त्याची शैक्षणिक प्रगती पुढे सुरु राहिली पाहिजे. ऑनलाइन शिक्षणाने ज्ञानाचे जग विद्यार्थ्यांसाठी खुले केले. पण प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात स्मार्टफोन आहे का? प्रत्येक घरात पुरेसे इंटरनेट आहे का? एका मोबाइलवर अनेक मुले शिक्षण घेत असतील तर त्याला आपण डिजिटल समानता म्हणू शकतो का? डिजिटल साधने उपलब्ध करून देणे ही पहिली पायरी आहे; त्यांचा अर्थपूर्ण वापर शिकवणे ही बाब महत्त्वाची आहे.

पदवी मिळाली पण रोजगार मिळाला का? हा प्रश्न आजच्या शिक्षणासमोरील सर्वात मोठ्या प्रश्नांपैकी एक आहे. शिक्षण आणि रोजगार यांच्यातील दरी वाढत असेल तर शिक्षणाच्या गुणवत्तेचा पुनर्विचार करावा लागेल. आजच्या विद्यार्थ्याला पदवीसोबत –डिजिटल कौशल्य, संवादकौशल्य, इंग्रजी, समस्या सोडवण्याची क्षमता, तांत्रिक कौशल्य, उद्योजकता यांची गरज आहे. मराठवाड्याच्या शिक्षणाला स्थानिक अर्थव्यवस्थेशी जोडणे त्यामुळे महत्त्वाचे आहे.दुष्काळी भागात जलव्यवस्थापन, कृषी–तंत्रज्ञान, अन्नप्रक्रिया आणि सौरऊर्जा; औद्योगिक भागात इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल, संगणक आणि तांत्रिक कौशल्ये–अशा पद्धतीने स्थानिक गरजांशी शिक्षण जोडले पाहिजे. शिक्षणातून रोजगार आणि रोजगारातून आर्थिक स्वावलंबन ही साखळी मजबूत झाली तरच शिक्षणाचा खरा सामाजिक परिणाम दिसेल. गावातील अनेक हुशार विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, व्यावसायिक अभ्यासक्रम, शिष्यवृत्ती, खख, पॉलिटेक्निक, वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी क्षेत्रातील संधी यांची माहिती पुरेशी नसते. माहितीचा अभाव हा देखील एक प्रकारचा शैक्षणिक मागासलेपणा आहे.

**शिक्षणाचा दृष्टिकोन बदलण्याची गरज ?**

मराठवाड्यात शिक्षणासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. यामुळे मराठवाड्यात शिक्षणाचा संख्यात्मक विकास होत आहे.परंतु गुणात्मक विकास झाला नाही असे मला वाटते. कारण अनेक शाळेमध्ये तिसरी –चौथी पर्यंत मुलांना व्यवस्थित लिहिता – वाचता येत नाही. हीच परिस्थिती पुढेही कायम राहते. त्यामुळे विद्यार्थी पुढे अभ्यास न करता पास होण्यासाठी कॉपीचा आश्रय घेतो. विद्यार्थी परीक्षेत पाहून लिहितो, पास होतो,आणि एका वर्गातून पुढच्या वर्गात जातो. विद्यार्थ्यांची मानसिकता ही एका वर्गातून पुढच्या वर्गात पास होऊन जाणे एवढीच शिल्लक राहिली आहे. गुणवत्ता सुधारण्याचा दृष्टिकोन त्यांच्यामध्ये दिसत नाही. यामुळे त्याचा गुणवत्तापूर्ण शैक्षणिक विकास होत नाही,असे मला वाटते .आज आमच्याकडे झह. ऊ पर्यंत शिक्षणाची सुविधा आहे. पीएच. डी. च्या विविध शिष्यवृत्ती मिळतात.परंतु सदर विद्यार्थ्यांना संशोधन म्हणजे काय, हे माहित नाही. अनेक विद्यार्थ्यांना मराठी भाषेत साधा अर्ज सुद्धा लिहिता येत नाही. ही वास्तव परिस्थिती आम्ही दैनंदिन अनुभवत आहोत. याचा अर्थ असा की मराठवाड्यात संख्यात्मक शैक्षणिक वाढ झाली आहे. परंतु मराठवाड्यातील विद्यार्थ्यांचा गुणात्मक दर्जा वाढला नाही. म्हणून प्रश्न हा केवळ शैक्षणिक योजनांचा अभाव हा नाही तर प्रश्न आहे उपलब्ध योजनांचा अंतिम परिणाम विद्यार्थ्यांच्या शिकण्यात किंवा गुणवत्ता सुधारण्यात किती दिसतो? म्हणून शाळा बांधली– पण विद्यार्थी शिकतो का? संगणक दिला–पण तो वापरला जातो का? शिक्षक प्रशिक्षण झाले–पण वर्गातील अध्यापन बदलले का? शिष्यवृत्ती दिली–पण विद्यार्थी शिक्षण पूर्ण करतो का? हे प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. म्हणून पुढे शिक्षणाचे मूल्यमापन किती खर्च झाला? यावर नव्हे तर किती शिकले? यावर झाले पाहिजे.

**मूळ प्रश्न ?**

मराठवाड्याच्या शिक्षणाचा प्रश्न केवळ किती मुले शाळेत आहेत? एवढाच नाही,तर खरा प्रश्न आहे–शाळेत गेलेल्या प्रत्येक मुलाला आपण खरोखर शिकवत आहोत का? जर या प्रश्नाचे उत्तर समाधानकारक नसेल तर आपल्याला शैक्षणिक विकासाची दिशा बदलावी लागेल. मराठवाड्याला केवळ अधिक शाळांची गरज नाही; तर चांगल्या शाळांची किंवा गुणवत्तापूर्ण शाळा–महाविद्यालयाची गरज आहे, केवळ अधिक पदवीधरांची गरज नाही; त्याला अधिक कौशल्यवान तरुणांची गरज आहे, केवळ अधिक साक्षरतेची गरज नाही; तर विचार करणारे, व्यवस्थेला प्रश्न विचारणारे आणि समस्या सोडवणारे नागरिक घडविण्याची गरज आहे. कारण दुष्काळावर मात करण्यासाठी पाणी लागते; पण दुष्काळाच्या परिस्थितीतून कायमस्वरूपी बाहेर पडण्यासाठी ज्ञान, कौशल्य आणि मानवी भांडवल लागते.

मराठवाड्याच्या विकासासाठी भविष्यातील सर्वात मोठी गुंतवणूक धरणे, रस्ते आणि उद्योगांबरोबरच विद्यार्थ्यांच्या मनात करावी लागेल.आजच्या वर्गखोलीत घडणारा विद्यार्थीच उद्याचा मराठवाडा घडवणार आहे आणि म्हणूनच प्रश्न केवळ असा नाही की– मराठवाड्यात शिक्षण किती आहे? खरा प्रश्न असा आहे–मराठवाड्यातील प्रत्येक मुलाला दर्जेदार शिक्षण मिळते आहे का? या प्रश्नाचे उत्तर होय होईपर्यंत मराठवाड्याचा विकास पूर्ण झालेला मानता येणार नाही.म्हणून मराठवाड्याच्या शिक्षणाचा प्रश्न केवळ शाळा –महाविद्यालयापर्यंत पोहोचण्याचा नाही; तो गुणवत्तेचा, संधींच्या समानतेचा आणि भविष्यातील रोजगाराचा आहे.




सायं दैनिक
नांदेड वार्ता
वर्धापन दिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा!
शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे
तुतारी वाजवणारा माणूस
मोहम्मद हसन खान पठाण
उपाध्यक्ष
अभय भिमराव महाजन
नगरसेवक
प्रविण इंद्रसिंग राठोड
नगरसेवक
चंद्रशेखर रंगराव नेम्मानीवार
नगरसेवक
श्रीराम नारायणराव नेम्मानिवार
सभापती, सार्वजनिक बांधकाम समिती
प्रशांत सुरेशराव कोरडे
स्वीकृत नगरसेवक
अश्विनी आदर्श जागरलावार
सभापती, स्वच्छता व आरोग्य समिती
गंगाबाई नारायणराव कोल्हे
नगरसेविका
निलोफर निसार भाटी
सभापती, पाणी पुरवठा समिती
नईमाबेगम मिर्झा सईद बेग
नगरसेविका
ललिताबाई मारोती मुनेश्वर
नगरसेविका
सौ. सुजाता विनोद एंड्रलवार
नगराध्यक्षा न.प.किनवट
शुभेच्छुक : शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) व
राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरद पवार) आघाडी किनवट शहर
करण विनोद एंड्रलवार
युवानेता किनवट


सायं दैनिक
नांदेड वार्ताच्या
रौप्य महोत्सवारंभानिमित्त
तसेच यशस्वी वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
मुन्ना अब्बास हुसैन
नगरसेवक
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका
कोषाध्यक्ष
नांदेड जिल्हा कॉंग्रेस कमिटी


कृषि उत्पन्न बाजार समिती नांदेड
मराठवाडा
मुक्ती संग्रामातील
विनम्र अभिवादन!
सायं दैनिक
नांदेड वार्ताच्या
रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त
तसेच यशस्वी वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा!
कृषी उत्पन्न बाजार समिती, नांदेड
शुभेच्छुक
संजय अण्णासाहेब लहानकर
सभापती
कृ.उ.बा.समिती, नांदेड
भुजंग पाटील डक
उपसभापती
कृ.उ.बा.समिती, नांदेड
सर्व सन्माननीय सदस्य : मा.आ.ओमप्रकाश पोकर्णा, भगवानराव पाटील आलेगांवकर, शामराव पाटील टेकाळे, बबनराव बारसे, नागोराव आढाव, गांधीजी पवार, निलेश देशमुख बारडकर, सत्यजित (सुमित) भोसले, गंगाधर (पिंटू) शिंदे, ज्ञानेश्वर राजेगोरे, गायत्रीताई गजानन कदम, कमलताई रंगनाथराव वाघ, निळकंठ मदने, नाना पोहरे, सदाशिवराव देशमुख तरोडेकर, शिवाजी दराडे.

# नांदेडच्या विकास आणि राजकारणाला दिशा देणारे - स.लड्डूसिंघ महाजन



स. रविन्द्रसिंघ मोदी
उपसंपादक,
नांदेड वार्ता.

श्रीगुरु गोबिंदसिंघजी महाराज यांच्या छत्र-छायेत आणि श्री गुरुग्रंथ साहिबजीं यांच्या सान्निध्यात हजूर साहिब नांदेड नगरीत शीख समाजाचे वास्तव्य जवळपास ३१८ वर्षांचे आहे. शिखांचे दहावे गुरु, श्री गुरु गोबिंदसिंघजी महाराज यांचे सन १७०८ मध्ये या भूमिवर आगमन झाले असले तरी सन १८३१ नंतरच शीख समाजाने येथे स्थलांतर करण्यास सुरुवात केली होती.

शेर-ए-पंजाब महाराज रणजीतसिंघजी यांनी पाठवलेली लाहौरी फौज नांदेडमध्ये पोहचली आणि त्यातील असंख्य जण येथेच स्थायिक झाले. त्यापैकी एका कुटुंबाचा संबंध सरदार लड्डूसिंघ महाजन (हरमीतसिंघ) यांच्याशी कायम आहे. सन १९४६ मध्ये १० जून रोजी स.लड्डूसिंघ महाजन यांचा जन्म स्व. हरीसिंघ महाजन यांच्या घरी झाला. आज वयाच्या ८० व्या वर्षी ते विविधक्षेत्रात सक्रीय आहेत.

स.लड्डूसिंघ महाजन यांना त्यांच्या कार्याची दखल घेत येथील स्वातंत्र्य सेनानी व कामगार नेते दिवंगत कॉ. अनंतराव नागापूरकर प्रतिष्ठानच्या वतीने स्व.कॉ.अनंतराव नागापूरकर स्मृति जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दि.१७ सप्टेंबर रोजी पुरस्काराचे वितरण एका समारंभात होत आहे. सदरील पुरस्कार आणि गौरव कै.अनंतरावजी नागापूरकर यांच्या नावाने असल्यामुळे वरील सन्मानास मोठे महत्व प्राप्त झाले आहे.

कारण स्व.अनंतरावजी नागापूरकर आणि स.लड्डूसिंघजी महाजन हे अनेक वर्षे एकमेकाचे चांगले मित्र होते. विचारसरणी जरी भिन्न असली तरी त्यांनी प्रदीर्घकाळ एकत्रितरित्या नांदेडच्या विकास आणि राजकारणावर खर्च केलेला आहे. आणि तो काळ एक इतिहास होऊन गेला आहे. तत्कालीन नांदेड नगर पालिकेत नगरसेवक म्हणून त्यांनी काही काळ एकत्रित सेवा केली होती. लड्डूसिंघ महाजन यांचे राजकारण १९७२ साली सुरु झाले आणि त्यांनी एकमोठे वलय निर्माण करण्यास सुरुवात केली. अनेक क्षेत्रात यश संपादन केले. दूसरीकडे स्व. अनंतरावजी नागापूरकर हे श्रमिक वर्गासाठी रात्रंदिवस झटणारे नेते म्हणून उदयास आले. भारतीय स्वातंत्र्याचा लढा व हैद्राबाद मुक्ती लढ्यात त्यांनी मोठे योगदान दिले. त्यांनी महाराष्ट्रात कामगार चळवळीची पकड अधिक मजबूत केली. अशा दोन्ही व्यक्तिंच्या मित्रत्वाचे ऋणानुबंध या पुरस्कारामुळे आणखीनच घट्ट झाले म्हणायला आज संधी उपलब्ध आहे. स. लड्डूसिंघजी महाजन यांच्या ८० वर्षांच्या वयात आणि त्यांच्या जवळपास ५५ वर्षांच्या राजकीय, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रात केलेले कार्य उल्लेखनीय ठरत आहेत. त्यांचे राजकीय यश, संघर्ष आणि उपक्रमशीलता आजच्या पिढीसाठी एक प्रेरणादायी ठरु शकते.

सरदार लड्डूसिंघ महाजन यांनी सन १९८४ ते सन १९९१ पर्यंत आणि सन १९९४ ते सन १९९७ दरम्यान येथील प्रतिष्ठित संस्था गुरुद्वारा सचखंड बोर्डाचे अध्यक्षपद भूषविले. त्यांच्या अध्यक्षीय कार्यकाळात गुरुद्वारा बोर्डांतर्गत मोठ्या संख्येत बांधकामे पूर्ण झाली. त्यामुळे बोर्डाच्या आर्थिक उत्पन्नावर सकारात्मक परिणाम झाला. सन १९८४ नंतरचा काळ शीख समाजासाठी अत्यंत कठीण गेला होता. ऑपरेशन ब्लू स्टार आणि माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर नांदेडमध्ये भाविकांची संख्या घटल्याने गुरुद्वारा बोर्ड आणि स्थानिक शीख समाजाला चिंताजनक परिस्थितीतून वाटचाल करावी लागली होती. त्यावेळी निर्माण झालेल्या बिकट आर्थिक परिस्थितीचा सामना करत बाजारपेठ इमारत निर्माण करणे हे एक मोठे धाडसच होते. अशा कठीण काळात त्यांच्या अध्यक्षतेखाली श्री हजूरसाहिब आय.टी.आय. संस्थेची स्थापना करण्यात आली. त्यांनी ज्युनियर कॉलेजही सुरू केले होते. खालसा हायस्कूलच्या नवीन इमारतीचे बांधकामही त्यांनी पूर्ण केले. तसेच यात्री निवासांच्या बांधकामावर लक्ष केंद्रित केले. ज्यामुळे गुरुद्वारात भविकांसाठी सुविधांची पूर्तता झाली. ऑपरेशन ब्लू स्टार आणि त्यानंतर देशभरात घडलेल्या शीख विरोधी दंगलींच्या परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या धार्मिक आणि राजकीय परिस्थितीत स.लड्डूसिंघ महाजन यांनी गुरुद्वारा बोर्ड संस्थेचे सक्षमतेने संचालन केले म्हणायला हरकत नाही. खर्या अर्थाने त्यांच्या कुशल नेतृत्वातून तेव्हाची ती परिस्थिती नियंत्रणात राहिली. नांदेड परिसरात तेव्हा कोणतीच अप्रिय घटना घडली नाही हे महत्वाचे आहे. स. लड्डूसिंघ महाजन यांनी राजकीय जीवनात मोठ्या व प्रस्थापित नेत्यांसोबत काम करून राजकीय अनुभव मिळवला. ते दोन वेळा नगरसेवकही राहिले. त्यांनी पद्मश्री स्व.शामरावजी कदम, माजी आमदार स्व. बापुसाहेब बारडकर, स्व.रामनारायण काबरा, स्व.नरेंद्रपाल बरारा, माजी केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती सूर्यकांता पाटिल, श्री विनायकराव नांदेडकर, श्री गोविंदसिंह तेहरा यांच्यासोबत नगर पालिकेत कार्य करतांना नांदेडच्या जडणघडण मध्ये आपला मोलाचा वाटा दिला हे मुद्दामहुन सांगावसे वाटते.

त्यांनी अनेक क्षेत्रात आपलं नाव कोरलं. नांदेडमध्ये त्यांनी हॉकी खेळांसाठी सर्वप्रथम पुढाकार घेतला. सन १९७२ मध्ये त्यांनी श्री गुरु गोबिंदसिंघजी सिल्वर कप हॉकी स्पर्धा सुरू केली. त्यानंतर श्री गुरु गोबिंदसिंघजी गोल्ड कप हॉकी स्पर्धे सारख्या प्रतिष्ठित क्रीडा स्पर्धेचे संचालन त्यांनी केले. क्रीडा क्षेत्रातही महाजन साहेब अनेक वर्षे कर्णधाराच्या भूमिकेतच कार्यरत राहिले. सामाजिक क्षेत्रातही त्यांनी उपयुक्त योगदान दिलेले आहे. त्यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी सिख वेलफेयर असोसिएशन संस्था स्थापन करून शिक्षण क्षेत्रास प्रोत्साहन दिले. सोबतच वैद्यकीय उपचार मदत देण्याचे छोटे-मोठे कामे सुरू केली आहेत. सर्वांना आठवत असेलच की, त्यांच्या वयाच्या ७५ व्या वाढदिवसाच्या वेळेस त्यांचा भव्य असा अमृत महोत्सव सत्कार पार पडला होता. त्यांच्या अमृत महोत्सवी सत्कार कार्यक्रमात सर्वपक्षीय नेत्यांची उपस्थिती लाभली होती. महाजन साहेबांनी २० वे शतक गाजवले, शिवाय भरपूर संघर्ष देखील केला. त्यांनी विविध क्षेत्रात दांडगा अनुभव मिळवीला. त्यानंतर २१ व्या शतकात त्यांनी आपल्या अनुभवाच्या बळावर नवीन पिढीला राजकारणात उतरवलं. त्यांचे सुपुत्र स. गुरमीतसिंघ महाजन गेली दहा वर्षे गुरुद्वारा बोर्ड संस्थेचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. तर दूसरा मुलगा स. गुरप्रीतसिंघ व्यवसायात कार्यरत आहे. त्यांच्या तीन्ही मुलीं उच्च शिक्षित आहेत आणि दोन मुलींनी तर पीएच डी पदवी मिळवली आहे. त्यांनी स्वतःचे जिवन सार्थक केले असून आज त्याच जीवनाचा गौरव होत आहे.







अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित,
देगलूर महाविद्यालय, देगलूर
सायं दैनिक नांदेड वार्ता च्या
रौप्य महोत्सव वर्षानिमित्त
तसेच यशस्वी वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा!


प्रकाश निवृत्तीराव पाटील बेम्बरेकर (अध्यक्ष)
जनार्धन जयराम चिद्रावार (उपाध्यक्ष)
डॉ.कर्मवीर पोशट्टी उनग्रतवार (सचिव)
राजकुमार राम महाजन (सहसचिव)
विलास शंकरराव तोटावार (कोषाध्यक्ष)

श्री.देवेंद्र बालाजीराव मोतेवार (कार्यकारिणी सदस्य), श्री.नारायणराव रामन्ना मैलागिरे (कार्यकारिणी सदस्य), श्री.सुर्यकांत गोविंद नारलावार (कार्यकारिणी सदस्य), श्री.गंगाधरराव यशवंतराव जोशी (कार्यकारिणी सदस्य), श्री.रविंद्र काशिनाथअप्पा द्याडे (कार्यकारिणी सदस्य), श्री.चंद्रकांत राजन्ना नारलावार (कार्यकारिणी सदस्य), श्री.गुरुराज शशिकांत चिद्रावार (स्विकृत सदस्य), श्री.विजय पोशट्टी उनग्रतवार (स्विकृत सदस्य), प्राचार्य डॉ.मोहन ना.खताळ (पदसिध्द सदस्य)



# मराठवाड्यातील उच्च शिक्षण : वास्तव आणि दिशा...

प्रा.डॉ. डी. एन. मोरे
पीपल्स कॉलेज, नांदेड (मो. ९४२३७४९८६०)
स्वारातीम विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य




१५ ऑगस्ट, १९४७ रोजी अनेक क्रांतिकारकांच्या बलिदानातून भारताला स्वातंत्र्य मिळाले.मात्र मराठवाडा हैदराबादच्या निजामी राजवटीच्या अधिपत्याखाली होता. त्याला मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढावी लागली. या मुक्ती लढ्याचे यशस्वी नेतृत्व पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांनी केले. १७ सप्टेंबर, १९४८ रोजी निजामी राजवट संपुष्टात आली व मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाले. त्या घटनेला आता ७९ वर्ष पूर्ण होत आहेत. सुरुवातीपासूनच मराठवाडा पायाभूत सुविधा, पाणी, उद्योगधंदे, आरोग्य, दळणवळणाच्या सोयी, वीज, कृषी, इत्यादी क्षेत्रात मागासलेला होता.त्याला शिक्षणक्षेत्रही आणि विशेषत: उच्च शिक्षणक्षेत्रही अपवाद नव्हते. त्यावेळेस उच्च शिक्षण देणारे औरंगाबाद येथे उस्मानिया विद्यापीठाशी संलग्नित एक शासकीय महाविद्यालय होते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९५० मध्ये औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मिलिंद कॉलेज तर नांदेड येथे पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांनी पीपल्स कॉलेजची स्थापना केली. २३ ऑगस्ट, १९५८ मध्ये औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठ व १७ सप्टेंबर, १९९४ रोजी नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

**मराठवाड्यातील उच्च शिक्षणाचे वास्तव**

मराठवाड्यात चार सार्वजनिक विद्यापीठे व एक खाजगी विद्यापीठ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांशी संलग्नित ९४५ महाविद्यालये असून त्यापैकी २११ अनुदानित तर ६७९ विनाअनुदानित तत्त्वावरील आहेत. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाशी संलग्नित ५९ महाविद्यालये असून त्यापैकी १६ अनुदानित तर ४३ विनाअनुदानित आहेत. मार्च २०१७ मध्ये औरंगाबाद येथे महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ स्थापन केले. २१ विधी महाविद्यालय असून त्यापैकी १० अनुदानित तर ११ विनाअनुदानित तत्त्वावरील आहेत. सद्यस्थितीला मराठवाड्यात जवळपास ७५ टक्के महाविद्यालये विनाअनुदानित तत्त्वावरील तर २५ टक्के अनुदानित आहेत. परंपरागत विद्याशाखेचे ०१, वैद्यकीय ०७ तर अभियांत्रिकीची ०२ शासकीय महाविद्यालये आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, मराठवाड्यातील उच्च शिक्षण खाजगीकरणाच्या वेढ्यात अडकले आहे.

मराठवाड्यात एकही केंद्रीय विद्यापीठ, आयआयटी, आयआयएम, एनआयटी, ट्रिपल आयटी, नायपर इत्यादी दर्जेदार शिक्षण देणाऱ्या उच्च शिक्षणसंस्था नसणे मागासलेपणाचे लक्षण आहे. १८ ते २३ वयोगटातील उच्च शिक्षणास पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशप्रमाणात महाराष्ट्रातील इतर प्रदेशाच्या तुलनेत मराठवाडा खूप मागे आहे. उच्च शिक्षणात भारतातील विद्यार्थ्यांचे प्रवेशप्रमाण ३० टक्के, महाराष्ट्रात ३६.४ टक्के तर मराठवाड्यात सरासरी १२ ते १५ टक्क्यांच्या आसपास आहे.

विद्यापीठे व महाविद्यालयातील सरासरी ४० टक्के शिक्षकीय पदे रिक्त आहेत. तासिका/कंत्राटी पद्धतीने नियुक्त्या करून अध्यापन केले जात आहे. उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाने नुकतेच ५०१२ शिक्षकीय पदे भरण्याचा शासन आदेश निर्गमित केला आहे. त्यामध्ये मराठवाड्यातील दोन्ही विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयात काही पदे भरली जातील, ही आशादायक बाब आहे. भरती पारदर्शक आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यात व्हावी असे शासनाने निर्देशित केले असले तरी वन प्लस डोनेशनचा रेट काढल्याची चर्चा आहे.

मराठवाडा उद्योगाच्या क्षेत्रात मागास असल्याने उच्चशिक्षितांना रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत. छत्रपती संभाजीनगर व इतर जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या एमआयडीसीचा अपवाद वगळता युवकांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या सुविधांचा अभाव आहे.

अस्तित्वात असलेल्या बहुतांशी महाविद्यालयामध्ये पायाभूत व तंत्रज्ञानाच्या सुविधा, अत्याधुनिक प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि कुशल मनुष्यबळ उपलब्ध नाही. त्यातली त्यात शहरी-ग्रामीण दरी आजही कायम आहे. ग्रामीण, आदिवासी, मागास व डोंगराळ भागातील महाविद्यालयात अपुऱ्या सोयी-सुविधा आहेत.

**भविष्यकालीन दिशा**

राष्ट्रीय शिक्षण धोरणाने आयआयटी व आयआयएम दर्जाच्या धरतीवर सुचविलेले बहुविद्याशाखीय शिक्षण आणि संशोधन विद्यापीठ मराठवाड्यातील निदान दोन जिल्ह्यात स्थापन करण्याबरोबरच प्रत्येक जिल्ह्यात एक मॉडेल बहुविद्याशाखीय उच्च शिक्षणसंस्था २०३० पर्यंत स्थापन करण्याची केलेली शिफारस अमलात आणणे आवश्यक आहे. एक भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) स्थापन करण्यासोबतच कौशल्य विद्यापीठ व किनवटसारख्या आदिवासीबहुल भागात ट्रायबल युनिव्हर्सिटी सुरू करणे गरजेचे आहे.

मराठवाड्यातील उच्च शिक्षणातील विद्यार्थी प्रवेशप्रमाण व त्यांची वर्गातील उपस्थिती वाढविण्यासाठी कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे महत्त्वाचे आहे. उद्योगाच्या क्षेत्रातील मराठवाड्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी मोठ्या प्रमाणात उद्योग निर्माण केले पाहिजेत. त्यामधून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

मा. सर्वोच्च न्यायालय व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशाप्रमाणे शिक्षकीय पदे १०० टक्के भरणे महत्त्वाचे आहे. शिक्षक भरती गुणवत्तेवर आधारित झाली पाहिजे.

पायाभूत व तंत्रज्ञानाच्या सोयीने ग्रामीण, आदिवासी व डोंगराळ भागातील महाविद्यालये परिपूर्ण होण्याच्या दृष्टीने आर्थिक सहाय्य उपलब्ध करणे महत्त्वाचे आहे. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी भरीव आर्थिक मदत देणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाला अपेक्षित अभ्यासक्रमाची पुनर्रचना व अध्ययन -अध्यापनात कालसुसंगत बदल करणे आवश्यक आहे. शिक्षण व स्थानिक गरजा यांचा मेळ घालणे व अभ्यासक्रमात शेती, उद्योग, पाणी, आरोग्य, पर्यटन, ग्रामीण विकास इत्यादींचा समावेश करण्यासोबतच त्यावर संशोधन करणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमात रोजगाराभिमुख कौशल्य, आंतरवासिता, इंटरनशिप व नोकरी प्रशिक्षणचा समावेश करून विद्यार्थ्यांना व्यावसायिक व व्यवहारिक ज्ञान देणे महत्त्वाचे आहे.

मराठवाड्याच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, कृषी, पर्यावरण, इत्यादी समस्यांवर विद्यापीठाने संशोधन करून त्यातील निष्कर्ष शासनापर्यंत सादर करणे त्या व आधारे शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे व त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. मराठवाड्यात शिक्षणाचा विस्तार झाला; हे अगदी खरे असले तरी सर्वांना समन्यायी, सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नाही. आजही सरासरी ८५ टक्के विद्यार्थी उच्च शिक्षण प्रवाहाच्या बाहेर आहेत. त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणत कौशल्याधारित, मूल्याधारीत व रोजगाराभिमुख शिक्षण उपलब्ध करण्याची आवश्यकता आहे. दरवर्षी मराठवाडा मुक्ती दिनाच्या दिवशी (१७ सप्टेंबर) राज्य मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करून सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, कृषी, पर्यावरण, पाणी इत्यादी विषयावर धोरणात्मक निर्णय घेत भरीव आर्थिक निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे. त्यातली त्यात शिक्षणातूनच व्यक्ती, समाज आणि प्रदेशाचा विकास होत असतो. मराठवाडाही त्याला अपवाद नाही. त्यामुळे मराठवाड्याच्या विकासाचे शिक्षण हेच एकमेव परिवर्तनाचे साधन असून त्यासाठी भरीव आर्थिक निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. समाजातील सर्व समूहांना समान संधीचे गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण, कौशल्यज्ञान, रोजगार आणि दर्जेदार संशोधन उपलब्ध करून दिले तर मराठवाडा विकासाच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकेल.

## श्रमाची वाट निवडणारी सुशिक्षीत रणरागिणी - कॉ. वैशाली धुळे



सुशिक्षित असूनही कष्टाला कधीही कमीपणा न मानता, श्रमाला प्रतिष्ठा आणि कामगारांच्या हक्कांना संघर्षाची दिशा देणाऱ्या कॉम्रेड वैशाली धुळे यांचा जीवनप्रवास हा आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे.शिक्षण घेऊन चांगल्या संधीच्या शोधात पुढे जाण्याऐवजी परिस्थितीने त्यांच्यासमोर वेगळीच वाट उभी केली. मात्र परिस्थितीपुढे गुडघे टेकण्याऐवजी त्यांनी कष्टाची वाट स्वीकारली. सध्या त्या नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेत कंत्राटी सफाई कामगार म्हणून कार्यरत आहेत. हातात शिक्षणाची पदवी असतानाही हातात झाडू घेण्याची वेळ आली, म्हणून त्यांनी कधीही आपल्या कामाची लाज बाळगली नाही. उलट, काम कोणतेही असो, ते प्रामाणिकपणे आणि स्वाभिमानाने करायचे, ही भूमिका त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केली आहे. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी पहाटेपासून रस्त्यावर उतरणाऱ्या सफाई कामगारांच्या कष्टांकडे समाज अनेकदा सहजतेने पाहतो. मात्र त्यांच्या मागे असलेली मेहनत, असुरक्षितता, कंत्राटी पद्धतीची नोकरी आणि भविष्यातील अनिश्चितता फार कमी लोकांच्या लक्षात येते. वैशाली धुळे यांनी ही वेदना जवळून अनुभवली आहे.

**- कॉ. भगवान नाईक**

## संघर्षातून घडलेले नेतृत्व : कॉ. प्रकाश बैलकवाड



गरीब आणि कष्टकरी कुटुंबात जन्मलेल्या कॉ. प्रकाश बैलकवाड यांचे जीवन प्रतिकूल परिस्थितीशी केलेल्या संघर्षाची प्रेरणादायी कहाणी आहे. आर्थिक अडचणींमुळे त्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागले. मात्र परिस्थितीसमोर हार न मानता त्यांनी कष्टकरी माणसाच्या हक्कांसाठी लढण्याचा मार्ग स्वीकारला. ग्रामीण गरीब आणि मजुरांना रोजगाराची हमी मिळावी, या उद्देशाने अस्तित्वात आलेल्या मनरेगा कायद्याच्या अंमलबजावणी प्रक्रियेत ग्राम रोजगार सेवक म्हणून काम करताना त्यांनी ग्रामीण मजुरांचे प्रश्न, त्यांच्या हालअपेष्टा आणि रोजगारासाठीची धडपड जवळून अनुभवली. या अनुभवातूनच ग्राम रोजगार सेवकांच्या समस्यांकडे पाहण्याची त्यांची दृष्टी अधिक व्यापक झाली. अल्प मानधनावर आणि अनेक अडचणींमध्ये काम करणाऱ्या ग्राम रोजगार सेवकांच्या न्याय्य मागण्यांसाठी त्यांनी आयटकच्या माध्यमातून उभ्या राहिलेल्या संघटनेत सक्रिय सहभाग घेतला. संघटनेच्या बळावर विविध आंदोलने उभी करत त्यांनी शासन-प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला.

**- कॉ. देवराव नारे**

## निर्भीड पत्रकारितेचा ध्यास : महाबळे



गेल्या पंचवीस वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेले ज्येष्ठ पत्रकार रत्नाकर महाबळे यांनी लोहा तालुक्यासह नांदेड जिल्ह्यात आपल्या निर्भीड आणि निःस्पृह पत्रकारितेचा ठसा उमटविला आहे. सामाजिक प्रश्न, कामगार, कष्टकरी आणि वंचित घटकांच्या प्रश्नांना आपल्या लेखणीच्या माध्यमातून सातत्याने वाचा फोडत त्यांनी पत्रकारितेला केवळ बातमी देण्याचे माध्यम न ठेवता सामान्य माणसाच्या प्रश्नांना आवाज देण्याचे प्रभावी साधन बनविले आहे. विविध वृत्तपत्रे आणि वृत्तमाध्यमांच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागातील प्रश्नांना व्यापक व्यासपीठ मिळवून दिले आहे. पत्रकारितेसोबतच जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला असून त्यांनी तालुका सरचिटणीस, कार्याध्यक्ष आणि उपाध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी सामाजिक आणि धम्म चळवळीतही योगदान दिले आहे. भारतीय बौद्ध महासभेच्या नांदेड जिल्हा सरचिटणीसपदाची जबाबदारी सांभाळताना गेल्या अनेक वर्षांपासून 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथाचे सार्वजनिक वाचन व अर्थस्पष्टीकरण करण्याचे कार्य ते सातत्याने करीत आहेत.

लेखणीला सामाजिक जाणिवेची जोड देत सामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविणारे रत्नाकर महाबळे हे ग्रामीण पत्रकारितेतील संवेदनशील, निर्भीड आणि सामाजिक बांधिलकी जपणारे पत्रकार म्हणून आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व आहे.

**- कॉ. सय्यद मलंग**

## कष्टाळू रणरागिणी - कॉ.मीना हटकर



नांदेड शहरालगतच्या तुपा ग्रामपंचायत क्षेत्रातील एका गरीब कुटुंबात जन्मलेली कॉ. मीना आनंद हटकर आयुष्याने जरी त्यांना गरिबी, संघर्ष आणि अपमान दिला, तरी त्यांनी त्या प्रत्येक वेदनेतून स्वतःला घडवलं.

लग्नानंतर संसाराची जबाबदारी, तीन मुलांचे संगोपन आणि आर्थिक ताण-या सगळ्यांनी त्यांना कधीच विश्रांती दिली नाही. पण त्या हार मानणाऱ्यांतल्या नव्हत्या. अजून शहर झोपेत असताना त्या हातात झाडू घेऊन रस्त्यावर उभ्या असायच्या. सकाळी पाचपासून दुपारी दोन वाजेपर्यंत शहरातील रस्त्यांची सफाई-कडक उन्हात, पावसात, थंडीत कोणतीही तक्रार नाही, कोणतीही कुरकुर नाही. घरात परतल्यावर त्या पुन्हा कामाला बसायच्या-विड्या वळायला. दररोज तब्बल १००० विड्या! त्या विड्या २५-२५ च्या कट्ट्यांमध्ये बांधायच्या आणि सायंकाळी कारखान्यात पोस्टिंग करायच्या. एका दिवसात दोन नोकऱ्या दोन जबाबदाऱ्या पण एकच ध्येय-माझ्या मुलांचं भविष्य उज्वल व्हावं. महानगरपालिकेत कंत्राटी सफाई कामगार म्हणून त्यांना महिन्याला केवळ १८०० रुपये मजुरी मिळायची. त्यातही दोन-दोन, चार-चार महिने पगार वेळेवर नाही. कधी २००, कधी ४०० रुपये हातात पडायचे. एवढ्या कष्टानंतरही अपमान सहन करावा लागायचा. पण एक दिवस त्यांच्या मनात ठिणगी पेटली. दूरदर्शनवर कामगारांचे आंदोलन पाहून त्यांनी ठरवलं-अन्याय सहन करायचा नाही. त्यांनी सर्व कंत्राटी सफाई कामगारांना एकत्र केलं.


**- राज गोडबोले**






# इसाखान सरदारखान : क्रीडाप्रेमी लोकसेवक...

माणूस किती जगला, कसा जगला यापेक्षा तो कोणासाठी जगला, याला मानवी जीवनात मोठे महत्त्व आहे. या विचाराची प्रचिती आपल्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनातून देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे इसाखान सरदारखान.किनवटच्या सार्वजनिक जीवनात प्रदीर्घ काळ सक्रिय राहून नगर परिषदेचे नगराध्यक्ष म्हणून त्यांनी शहराच्या विकासासाठी योगदान दिले. प्रशासनाच्या माध्यमातून काम करताना सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवणे, विविध समाजघटकांमध्ये संवाद आणि सलोखा निर्माण करणे, ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये राहिली. आजही सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा ज्येष्ठ माजी नगराध्यक्ष म्हणून सन्मानपूर्वक उल्लेख केला जातो. शिक्षण क्षेत्राशीही त्यांचे घट्ट नाते राहिले. किनवट उर्दू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी काम केले. समाजाच्या विकासासाठी




राजकीय सत्तेबरोबरच शिक्षण आणि सामाजिक जाणीव महत्त्वाची आहे, या भूमिकेतून त्यांनी आपली वाटचाल केली.

इसाखान सरदारखान यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे कुस्ती आणि मैदानी खेळांवरील त्यांचे प्रेम. महाराष्ट्रातील प्रख्यात कुस्तीपटू म्हणून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली. मात्र केवळ स्वतः खेळाडू म्हणून यश मिळविण्यापुरते त्यांचे कार्य मर्यादित राहिले नाही. कुस्तीसारख्या पारंपरिक मैदानी खेळांना योग्य प्रतिष्ठा, व्यासपीठ आणि प्रोत्साहन मिळावे, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. तरुणांच्या अंगातील ऊर्जा सकारात्मक दिशेने वळविण्यासाठी क्रीडा हे प्रभावी माध्यम आहे, ही भूमिका त्यांनी आपल्या कार्यातून अधोरेखित केली. त्यांच्या सार्वजनिक जीवनामागे वडील सरदारखान यांचा समृद्ध वारसा आहे. सरदारखान हे कम्युनिस्ट पक्षाचे प्रदीर्घकाळ नगरसेवक व नगराध्यक्ष होते. लोकांच्या प्रश्नांसाठी काम करण्याची ही परंपरा इसाखान सरदारखान यांनी पुढे नेली. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा लालबावटा खांद्यावर घेतला असतानाही अन्य राजकीय पक्ष आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना सन्मानाची वागणूक देणे, ही त्यांच्या राजकीय संस्कारांची आणि व्यापक लोकशाही दृष्टिकोनाची ओळख आहे. राजकारण म्हणजे केवळ निवडणूक आणि सत्ता नव्हे, तर समाज घडविण्याचे माध्यम आहे, या विचारातून त्यांनी राजकारणात वेगवेगळे प्रयोग करण्याचा प्रयत्न केला. विशेषतः चांगले, अभ्यासू आणि सामाजिक जाणीव असलेले तरुण राजकारणात सहभागी व्हावेत आणि त्यांच्या माध्यमातून समाजहिताचे कार्य घडावे, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले. नव्या पिढीला संधी देण्याची ही भूमिका त्यांच्या सार्वजनिक जीवनातील विशेष जमेची बाजू आहे. राजकीय मतभेद असले तरी वैयक्तिक संबंध आणि सामाजिक सलोखा टिकवून ठेवणे, विविध विचारांच्या लोकांना सोबत घेणे आणि समाजाच्या व्यापक हिताला प्राधान्य देणे, ही त्यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये राहिली आहेत. लोकसेवा, शिक्षण, क्रीडा, सामाजिक सलोखा आणि लोकशाही मूल्यांवरील निष्ठा अशा विविध पैलूंनी समृद्ध असलेल्या इसाखान सरदारखान यांच्या प्रदीर्घ कार्याचा गौरव म्हणून कॉम्रेड अनंतराव नागापूरकर प्रतिष्ठानच्या वतीने त्यांना कॉम्रेड अनंतराव नागापूरकर जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.

– कॉ. शिवाजी फुलवळे










रौप्य २५ महोत्सव
सायं दैनिक नांदेड वार्ता च्या
रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त
तसेच यशस्वी वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छूक
स.विरेंद्रसिंघ गाडीवाले
सभापती
स्थायी समिती
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड


मराठवाडा
मुक्ती संग्रामातील
हुतात्मे व स्वातंत्र्य सैनिकांना
विनम्र अभिवादन!
25 वर्षे नांदेड वार्ता
नांदेड जिल्ह्यातील अग्रगण्य
सायं दैनिक नांदेड वार्ता च्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छूक
सुमित गणपतराव मोरगे
मे.शारदा कन्स्ट्रक्शन ॲण्ड कार्पो.प्रा.लि.
अशोकनगर, नांदेड




सायं दैनिक **नांदेड वार्ता**

रौप्य महोत्सव २५

www.nandedwarta.blogspot.com www.nandedwarta.com

। वर्ष २५ वे । अंक १ । गुरुवार दि. १७ सप्टेंबर २०२६ । नांदेड पोस्ट परवाना क्र.जी.-२/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ पाने ८ +४ । स्वागत मुल्य १० रु.


# मराठवाडा मुक्तिसंग्राम : स्वातंत्र्याची दुसरी पहाट


– डॉ.राजेंद्र बगाटे
समाजशास्त्राचे अभ्यासक


भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिशांच्या दीर्घकाळ चाललेल्या राजवटीतून स्वातंत्र्य मिळाले. देशभर स्वातंत्र्याचा उत्सव साजरा झाला आणि भारतीय जनतेने परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्त झाल्याचा आनंद व्यक्त केला. मात्र या स्वातंत्र्याची पहाट भारताच्या प्रत्येक प्रदेशात एकाच वेळी उगवली नाही. तत्कालीन हैदराबाद संस्थानातील मराठवाडा, तेलंगण आणि कर्नाटकातील काही प्रदेश अजूनही निजामाच्या अधिपत्याखाली होते. त्यामुळे ब्रिटिश सत्तेपासून भारत स्वतंत्र झाला असला, तरी या प्रदेशातील जनतेला निजामशाहीच्या राजवटीतून मुक्त होण्यासाठी आणखी एका संघर्षाला सामोरे जावे लागले. या संघर्षाचे अंतिम पर्व १७ सप्टेंबर १९४८ रोजी संपन्न झाले. हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले आणि मराठवाड्याच्या जनतेला निजामाच्या राजवटीतून मुक्ती मिळाली. म्हणूनच १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन म्हणून स्मरणात ठेवला जातो. हा दिवस केवळ एका ऐतिहासिक घटनेचे स्मरण करण्याचा दिवस नसून स्वातंत्र्य, लोकशाही, मानवी प्रतिष्ठा आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी लढलेल्या असंख्य ज्ञात–अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

हैदराबाद संस्थान हे तत्कालीन भारतातील सर्वांत मोठ्या संस्थानांपैकी एक होते. निजामाच्या अधिपत्याखालील या संस्थानात आजच्या तेलंगणाचा मोठा भाग, महाराष्ट्रातील संपूर्ण मराठवाडा आणि कर्नाटकातील काही प्रदेशांचा समावेश होता. निजामाची सत्ता स्वतंत्र भारताच्या राजकीय प्रक्रियेपासून वेगळी राहण्याचा प्रयत्न करीत होती. भारत स्वतंत्र झाल्यानंतर संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण हा राष्ट्रीय एकात्मतेचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न बनला. अनेक संस्थानांनी भारतात विलीन होण्याचा निर्णय घेतला; मात्र हैदराबाद संस्थानाच्या बाबतीत परिस्थिती गुंतागुंतीची होती. निजामाला स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवण्याची इच्छा होती. परिणामी भारतीय संघराज्यात सामील होण्याची मागणी करणाऱ्या जनतेचा संघर्ष अधिक तीव्र झाला.

मराठवाड्यातील जनतेच्या संघर्षाची मुळे केवळ १९४७ नंतरच्या राजकीय परिस्थितीत शोधता येत नाहीत. निजामशाहीच्या काळात राजकीय स्वातंत्र्य, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य आणि शिक्षणाच्या संधी यांवर अनेक मर्यादा होत्या. सामान्य जनतेमध्ये असंतोष निर्माण होत होता. सामाजिक आणि आर्थिक विषमता, प्रशासनातील केंद्रीकरण आणि जनतेच्या राजकीय सहभागाचा अभाव यामुळे स्वातंत्र्याची आकांक्षा अधिक तीव्र होत गेली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याने देशभरात निर्माण केलेली राष्ट्रीय जाणीव मराठवाड्यातही पोहोचली होती. भारतीय राष्ट्रध्वज, वंदे मातरम्चा जयघोष आणि लोकशाही शासनव्यवस्थेची मागणी यांतून जनतेच्या मनातील परिवर्तनाची इच्छा स्पष्टपणे व्यक्त होत होती.

हैदराबाद स्टेट काँग्रेसने या संघर्षाला संघटित स्वरूप देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. स्वामी रामानंद तीर्थ हे या आंदोलनातील प्रमुख नेते म्हणून पुढे आले. त्यांनी हैदराबाद संस्थानातील जनतेला लोकशाही अधिकारांसाठी संघटित करण्याचे काम केले. मराठवाड्यातील अनेक कार्यकर्त्यांनी या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा, पी. एच. पाटवर्धन यांसारख्या कार्यकर्त्यांनी संघर्षाला दिशा दिली. त्यांच्या सोबत असंख्य कार्यकर्ते गावोगावी जनजागृती करीत होते. अनेकांनी तुरुंगवास भोगला, पोलिसांचा छळ सहन केला, आर्थिक संकटांना सामोरे गेले आणि आपल्या कुटुंबीयांपासून दूर राहून स्वातंत्र्याच्या लढ्यात योगदान दिले. या संघर्षाचा इतिहास केवळ काही नेत्यांचा इतिहास नसून सामान्य माणसाच्या धैर्याचा आणि त्यागाचा इतिहास आहे.

मराठवाडा मुक्तिसंग्रामात ग्रामीण समाजाचा सहभाग विशेष महत्त्वाचा होता. गावातील शेतकरी, कामगार, विद्यार्थी, शिक्षक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि महिला यांनी आपल्या परीने आंदोलनाला पाठिंबा दिला. त्या काळात माहितीची साधने मर्यादित होती; तरीही स्वातंत्र्य आणि लोकशाहीची जाणीव लोकांपर्यंत पोहोचत होती. गावागावांतून कार्यकर्ते तयार झाले. अनेकांनी सरकारी दडपशाहीची पर्वा न करता राष्ट्रीय विचारांचा प्रचार केला. काहींनी भूमिगत राहून कार्य केले. काहींनी सत्याग्रह केले, तर काहींनी कारावास पत्करला. या सर्व प्रयत्नांतून निजामशाहीविरोधातील लोकमत अधिक व्यापक होत गेले.

या काळातील परिस्थिती अधिक गंभीर बनविण्यात रझाकारांच्या हिंसक कारवायांचा मोठा वाटा होता. निजामाच्या सत्तेला पाठिंबा देणाऱ्या रझाकारांनी स्वातंत्र्य आणि भारतीय संघराज्यातील विलिनीकरणाची मागणी करणाऱ्या जनतेवर दडपशाही केली. अनेक भागांत भीतीचे वातावरण निर्माण झाले. सामान्य नागरिकांवर अत्याचार झाले. आंदोलनकर्त्यांना धमकावले गेले. त्यामुळे जनतेच्या मनातील असंतोष आणखी वाढला. या हिंसक वातावरणातही स्वातंत्र्याची मागणी मागे घेण्यास अनेक कार्यकर्ते तयार नव्हते. स्वातंत्र्य हा त्यांच्यासाठी केवळ राजकीय अधिकार नव्हता, तर तो मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न बनला होता.

भारत सरकारसमोर हैदराबाद संस्थानाचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होत गेला. भारताची भौगोलिक आणि राजकीय एकात्मता टिकविण्यासाठी संस्थानांचे विलीनीकरण आवश्यक होते. तत्कालीन उपपंतप्रधान आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थानांच्या भारतातील विलीनीकरणात निर्णायक भूमिका बजावली. हैदराबाद संस्थानाच्या प्रश्नावर चर्चा आणि वाटाघाटींचे प्रयत्न झाले; मात्र परिस्थितीत अपेक्षित तोडगा निघाला नाही. अखेर भारत सरकारने सप्टेंबर १९४८ मध्ये लष्करी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. १३ सप्टेंबर १९४८ रोजी सुरु झालेल्या या कारवाईला ऑपरेशन पोलो असे नाव देण्यात आले. काही दिवसांच्या कारवाईनंतर निजामाने शरणागती पत्करली आणि १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले.

१७ सप्टेंबर हा त्यामुळे मराठवाड्याच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस ठरला. मात्र या दिवसाचा अर्थ केवळ लष्करी कारवाईच्या यशापुरता मर्यादित ठेवणे योग्य ठरणार नाही. त्यामागे अनेक वर्षे चाललेला जनसंघर्ष, कार्यकर्त्यांचे त्याग, जनजागृती, सत्याग्रह, कारावास आणि सामान्य जनतेच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा होत्या. भारतीय सैन्याच्या कारवाईने मुक्तीची निर्णायक प्रक्रिया पूर्ण केली; परंतु त्यासाठी पोषक वातावरण तयार करणाऱ्या जनआंदोलनाचे योगदान तितकेच महत्त्वाचे होते. म्हणून मराठवाडा मुक्तिसंग्रामाची गाथा सांगताना राजकीय नेतृत्वासोबतच सामान्य जनतेच्या सहभागाचे स्मरण करणे अत्यावश्यक आहे.

मुक्तिसंग्रामाचे महत्त्व केवळ निजामशाहीच्या अंतामध्ये नाही, तर त्यातून निर्माण झालेल्या लोकशाहीच्या नव्या पर्वात आहे. राजकीय सत्ता ही जनतेच्या संमतीवर आधारित असावी, नागरिकांना समान अधिकार मिळावेत, कायद्यापुढे सर्व समान असावेत आणि शासन जनतेप्रती उत्तरदायी असावे, ही लोकशाहीची मूलभूत तत्त्वे आहेत. निजामशाहीच्या राजवटीविरुद्ध संघर्ष करणाऱ्या जनतेच्या आकांक्षांना पुढे भारतीय संविधानाने व्यापक आणि संस्थात्मक अधिष्ठान दिले. म्हणूनच मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास संविधानाच्या मूल्यांशी जोडून समजून घेणे आवश्यक आहे.

भारतीय संविधानाने स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले. आज आपण या मूल्यांचा उपभोग घेत असलो, तरी त्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. मुक्तिसंग्रामात ज्यांनी संघर्ष केला, त्यांनी पुढील पिढ्यांसाठी अधिक चांगल्या समाजाचे स्वप्न पाहिले होते. त्यामुळे त्यांच्या त्यागाचे स्मरण केवळ पुष्पहार अर्पण करून किंवा शासकीय कार्यक्रम आयोजित करून पूर्ण होत नाही. त्यांच्या स्वप्नातील समाज निर्माण करण्यासाठी सामाजिक विषमता कमी करणे, शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचविणे, महिलांना समान संधी देणे, वंचित घटकांच्या अधिकारांचे संरक्षण करणे आणि लोकशाही संस्थांना अधिक सक्षम करणे आवश्यक आहे.

मराठवाड्याच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाचा प्रश्नही या संदर्भात महत्त्वाचा आहे. मुक्तीनंतरच्या काळात या प्रदेशाने शिक्षण, शेती, उद्योग, आरोग्य, वाहतूक आणि सामाजिक क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली. अनेक शैक्षणिक संस्था उभ्या राहिल्या. उच्च शिक्षणाच्या संधी वाढल्या. उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विस्तार झाला. तरीही मराठवाड्यापुढे पाणीटंचाई, शेतीची अनिश्चितता, बेरोजगारी, स्थलांतर, ग्रामीण दारिद्र्य, आरोग्यविषयक अडचणी, औद्योगिक मागासलेपणा आणि प्रादेशिक असमतोल यांसारखी आव्हाने कायम आहेत. त्यामुळे राजकीय मुक्तीनंतर सामाजिक आणि आर्थिक विकासाची नवी लढाई सुरू ठेवणे आवश्यक आहे.

आजच्या पिढीने मराठवाडा मुक्तिसंग्रामाकडे केवळ गौरवाच्या दृष्टिकोनातून पाहू नये, तर त्यातून प्रेरणा घ्यावी. त्या काळातील लोकांनी आपल्या अधिकारांसाठी आवाज उठविला. आज आपल्या हातात संविधानाने दिलेले मतदानाचे, अभिव्यक्तीचे, शिक्षणाचे आणि समानतेचे अधिकार आहेत. या अधिकारांचा जबाबदारीने वापर करणे हे मुक्तिसंग्रामातील वारशाचे जतन करण्यासारखेच आहे. लोकशाहीमध्ये नागरिकांची भूमिका केवळ मतदान करण्यापुरती मर्यादित नसते. सार्वजनिक प्रश्नांवर जागरूक राहणे, प्रशासनाकडून पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची अपेक्षा करणे, सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे आणि संविधानिक मार्गाने परिवर्तनासाठी प्रयत्न करणे हीदेखील नागरिकांची कर्तव्ये आहेत.

मुक्तिसंग्रामाच्या इतिहासाचे जतन करण्याची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या आठवणी, पत्रे, छायाचित्रे, दस्तऐवज आणि मौखिक इतिहास अजूनही स्थानिक पातळीवर विखुरलेला आहे. त्याचे शास्त्रीय पद्धतीने संकलन आणि संवर्धन झाले पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यातील आणि गावातील मुक्तिसंग्रामाशी संबंधित इतिहास शोधून काढणे आवश्यक आहे. शाळा–महाविद्यालयांमध्ये स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाला प्रोत्साहन मिळाले पाहिजे. ज्यांनी प्रत्यक्ष संघर्ष केला त्यांच्या कुटुंबीयांच्या आठवणी नोंदवून ठेवणे आवश्यक आहे. इतिहास हा केवळ पाठ्यपुस्तकातील काही तारखा आणि घटनांचा संग्रह नसतो; तो समाजाच्या सामूहिक स्मृतीचा महत्त्वपूर्ण भाग असतो.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाची आठवण करताना समाजात कोणत्याही प्रकारचा द्वेष निर्माण होऊ नये, हीदेखील काळाची गरज आहे. इतिहासाचे स्मरण हे वर्तमानातील सामाजिक सलोखा मजबूत करण्यासाठी झाले पाहिजे. हा संघर्ष अन्याय, दडपशाही आणि लोकशाहीच्या अभावाविरुद्ध होता. त्यामुळे त्यातून मिळणारा संदेश हा मानवता, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा असला पाहिजे. कोणत्याही धर्म, जात किंवा भाषिक समूहाविषयी द्वेष निर्माण करण्याऐवजी लोकशाही मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीला प्राधान्य दिले पाहिजे. इतिहासाचा उपयोग विभाजनासाठी नव्हे, तर समाजाला एकत्र आणण्यासाठी झाला तरच त्याचे स्मरण सार्थ ठरेल.

आज मराठवाड्याच्या विकासाचा विचार करताना येथील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविणे ही खरी गरज आहे. ग्रामीण शेतकरी, महिला, कामगार, विद्यार्थी, आदिवासी, भटके–विमुक्त, दिव्यांग व्यक्ती, वृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणणे म्हणजे आधुनिक अर्थाने सामाजिक मुक्तीची वाटचाल होय. स्वातंत्र्याचा अर्थ केवळ राजकीय सत्ता बदलणे नसून प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने, सुरक्षितपणे आणि समान संधींसह जगता येणे हा आहे. त्यामुळे मुक्तिसंग्रामाच्या स्मृतीला विकासाच्या आणि सामाजिक न्यायाच्या ध्येयाशी जोडणे आवश्यक आहे.







3201 DEPOSIT OVER CRORES PLUS
सायं दैनिक नांदेड वार्ता वर्धापन दिनाप्रित्यर्थ मन:पूर्वक शुभेच्छा!
5850+ CRORES BUSINESS

सोने तारण कर्ज
लॉकर
आरटीजीएस/एनईएफटी
गोदाम पावती कर्ज
वाहन कर्ज
दैनिक ठेव योजना (पिग्मी)
मोबाईल बॅकिंग
मासिक उत्पन्न योजना

• मुदत ठेव (F.D.) योजना •

| गुंतवणूक कालावधी | व्याजदर |
|---|---|
| 30 ते 45 दिवस | 7.00% |
| 46 ते 180 दिवस | 8.00% |
| 181 ते 365 दिवस | 9.00% |
| 366 दिवसांहून अधिक | 10.00% |

2 वर्षपेक्षा जास्त 1 लाखावर मिळवा ₹ 900/-
2 वर्षपेक्षा कमी 1 लाखावर मिळवा ₹ 850/-
90 महिन्यात दाम दुप्पट

प्राईड ऑफ महाराष्ट्र पुरस्कार द्वारा महाराष्ट्र इंडस्ट्रीयल अँण्ड इकॉनॉमिकल डेव्हलपमेंट अँण्ड एस.एम.ई. चेंबर्स ऑफ इंडिया
प्रतिबिंब पुरस्कार द्वारा सहकार सुगंध, पुणे
दीपस्तंभ पुरस्कार २०१६-१७,१७-१८,१८-१९,१९-२०,२०-२१, २१-२२,२२-२३ द्वारा राज्य फेडरेशन, महाराष्ट्र राज्य
अर्थरत्न पुरस्कार द्वारा सह्याद्री उद्योग समूह, अहमदनगर
बँको पुरस्कार १५-१६,१६-१७,१७-१८,१८-१९,१९-२०, २०-२१, २१-२२ द्वारा अवीज् पब्लिकेशन, कोल्हापूर
सहकार गौरव पुरस्कार २१-२२,२२-२३ द्वारा फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को-ऑप.क्रेडिट सोसायटीज लिमिटेड, पुणे
राष्ट्रीय पुरस्कार-बेस्ट को-ऑप.सोसायटी द्वारा चेंबर ऑफ इंडियन मायक्रो स्मॉल अँण्ड मिडीयम इंटरप्राईजेस
सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार २०२२ द्वारा मल्टिस्टेट फेडरेशन, पुणे

धनंजय तांबेकर
व्यवस्थापकीय संचालक, गोदावरी अर्बन
संचालक, मॅफको

सौ. राजश्री हेमंत पाटील
अध्यक्ष,
गोदावरी अर्बन

गोदावरी अर्बन
मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि. नांदेड
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाना, गुजरात, गोवा
मुख्यालय : 'सहकारसूर्य' एमएसईबी समोर, तरोडा नाका, पूर्णा रोड,नांदेड-४३१६०५.फोन:०२४६२-२६७२७७, ७७७५००५७७७
Email : officeadmin@godavariurban.com
प्रशासकीय कार्यालय : रिजेंट चेंबर्स, पहिला मजला, स्टेटस हॉटेलच्या वर, नरीमन पॉईंट, मुंबई -४०००२१
Follow us on : www.godavariurban.com
विश्वास तुमचा, जबाबदारी आमची!



# नांदेड जिल्हा लेबर कॉन्ट्रॅक्ट को-ऑप सोसायटीज् फेडरेशन नांदेड

सायं दैनिक नांदेड वार्ताच्या
रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त
तसेच यशस्वी वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा...



लक्ष्मीकांत शंकरराव गोणे
चेअरमन

शाहुराज ग्यानोबा गायकवाड
व्हा.चेअरमन

संचालक सर्वश्री : मिलिंद उत्तमराव देशमुख,मनोहर विश्वनाथराव भोसीकर, रामलु लच्छिराम इलतेपवार, प्रदिप गंगाधर जाधव, उत्तमराव धुपसिंग राठोड, रामराव यशवंतराव सूर्यवंशी, दिगांबर महाजन पवळे, प्रताप शामराव सोळंके, सूभद्राबाई व्यंकटराव दबडे, भारत गोविंदराव रॅपनवाड, मुकुंदराव सुधाकरराव जवळगांवकर, अनिता दत्तात्रय येवते, साजेदा बेगम शौकत खाँन पठाण, विशाल संकुरवार (सचिव).



सायं दैनिक नांदेड वार्ताच्या
रौप्य महोत्सव वर्षानिमित्त
तसेच यशस्वी वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा!



मराठवाडा मुक्ती संग्रामातील
लढ्यात शौर्य गाजवणाऱ्या ज्ञात-अज्ञात हुतात्मे व स्वातंत्र्य सैनिकांना
विनम्र अभिवादन!

# महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन (ओंकार), शाखा नांदेड

शुभेच्छूक
धनंजय गुम्मलवार
(जिल्हाध्यक्ष, नांदेड)



बाबुराव पुजरवाड (राज्य अध्यक्ष)
देवेंद्र देशपांडे (राज्य सहसचिव)
राघवेंद्र मदनुरकर (सचिव, जिल्हा शाखा, नांदेड)
मुकेश पाटील (कार्याध्यक्ष, जिल्हा शाखा, नांदेड)
सचिन चौदंते (कोषाध्यक्ष, जिल्हा शाखा, नांदेड)
पवन तलवारे (केंद्रीय कार्यकारणी सदस्य)
संतोष मठपती (केंद्रीय कार्यकारणी सदस्य)
गणेश अंबेकर (विभागीय संघटक)
छाया कांबळे (विभागीय सचिव)
नागेश सिंदगीकर (केंद्रीय कार्यकारणी सदस्य)



सायं दैनिक नांदेड वार्ताच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!


कै. व्यंकटराव पाटील कवळे


कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर

# व्हि.पी.के.पतसंस्था
(कै.व्यंकटराव पाटील कवळे बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.सिंधी)

मुख्य कार्यालय : कृषी उत्पन्न बाजार समिती समोर, नविन मोंढा कमान नं.२, नांदेड ४३१६०२
vpkho.nanded@gmail.com 7263012370

कार्यक्षेत्र : महाराष्ट्र राज्य
एकूण शाखा : २९

800 कोटी कडे वाटचाल आपल्याच सहकार्याने...!



लॉकर्स सुविधा उपलब्ध

विविध ठेव योजना

ठेवीवरील आकर्षक व्याजदर

| | |
|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ७.००% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ८.००% |
| १८१ दिवस ते १२ महिने | ९.००% |
| १२ महिने १ दिवस ते २४ महिने | १०.००% |

ज्येष्ठ नागरिक, विधवा महिला, अनाथ मुली-मुले व दिव्यांगासाठी ठेवीवर ०.५०% ज्यादा व्याज दर

विशेष मुदत ठेव योजना

| कालावधी | गुंतवणूक | व्याजदर | गुंतवणूक | व्याजदर |
|---|---|---|---|---|
| ३१ दिवस | १,००,०००/- | ७.२५% | ३,००,०००/- | ७.५०% |
| ४६ दिवस | १,००,०००/- | ८.२५% | ३,००,०००/- | ८.५०% |
| ९० दिवस | १,००,०००/- | ९.००% | ३,००,०००/- | ९.२५% |
| १८१ दिवस | १,००,०००/- | ९.२५% | ३,००,०००/- | ९.७५% |
| ३६५ दिवस | १,००,०००/- | १०.००% | ३,००,०००/- | १०.५०% |

मासिक ठेव योजना

रु. १ लाख १८ महिने कालावधीसाठी गुंतवा व दर महा रु. ८७५ व्याज मिळवा.

| | | |
|---|---|---|
| ५०,००० | १८ महिने | ४३७ रु. दर महा |
| १,००,००० | १८ महिने | ८७५ रु.दर महा |
| ५,००,००० | १८ महिने | ४३७५ रु. दर महा |
| ५,७२,००० | १८ महिने | ५००५ रु. दर महा |

आर.डी./ लखपती ठेव योजना

रु.५८००/- दर महा १६ महिने भरा व रु.१ लाख व्याजासह मिळवा.

| | | |
|---|---|---|
| १३५०/- दरमहा | ५५ महिने | १,००,०००/- |
| ११००/- दरमहा | ३० महिने | १,००,०००/- |
| ५८००/- दरमहा | १६ महिने | १,००,०००/- |

धनवर्धिनी ठेव योजना
रु.१ लक्ष गुंतवा आणि ८० महिण्यात रु.२ लक्ष मिळवा.
(ज्येष्ठ नागरीकांसाठी ७७ महिने.)

कर्ज योजना
- सोने तारण कर्ज
- माल तारण कर्ज
- मुदतठेव तारण कर्ज
- व्यावसायिक कर्ज
- नजरगहाण कर्ज
- पतमर्यादा कर्ज
- महिला बचतगट कर्ज
- दुग्ध व्यवसाय कर्ज

संस्थेची ठळक वैशिष्ट्ये
- सातत्याने ऑडीट वर्ग 'अ'
- ISO 9001-2015 नामांकन प्राप्त संस्था
- बँको पुरस्कार २०२३-२४
- कोअर बँकिंग प्रणाली.
- आर.टी.जी.एस. व एन.ई.एफ.टी. सुविधा.
- एस.एम.एस.द्वारे मोबाईलवर सुचना.
- विनामूल्य मिनी ए.टी.एम. सुविधा
- तत्पर व विनम्र सेवा.
- अनुभवी व प्रशिक्षीत कर्मचारी वृंद.
- सुलभ व तात्काळ ग्राहकाभिमुख कर्ज सेवा.

सामाजिक उपक्रम
- आपत्तीग्रस्तांना तात्काळ आर्थिक मदत.
- वृक्षारोपन व पाणी आडवा पाणी जिरवा जलसंधारणाचे काम.
- गरीब होतकरु विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शैक्षणिक साहीत्यांचे वाटप
- योग शिबीर

ठेव व्याजदर १०%

शाखा संपर्क

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उमरी | 7263012372 | छ. चौक, नांदेड | 8956784612 | तरोडा बु. | 8668653952 |
| सिंधी | 7263012373 | अर्धापूर | 8956784613 | सोनारी फाटा | 8830294996 |
| कारेगांव | 7263012374 | देगलूर | 8956784614 | कवठा (वाळूज) | 9763101951 |
| उमरी शहर | 7263012375 | मुखेड | 8956784615 | विष्णुपुरी | 9112141409 |
| नांदेड | 7263012376 | तामसा | 8956784616 | कुंडलवाडी | 8668468329 |
| नायगांव | 7263012377 | हदगांव | 8956784617 | बिलोली | 7498397380 |
| नरसी | 7263012378 | मालटेकडी | 8956784618 | वारड | 9561929971 |
| भोकर | 7263012379 | लोहा | 8956784619 | बरबडा | 9172521143 |
| मुदखेड | 7263012380 | हिमायतनगर | 8956784620 | वाळूज | 7263012370 |
| धर्माबाद | 7263012381 | रविनगर, नांदेड | 8956784621 | | |




सायं दैनिक **नांदेड वार्ता** च्या
रौप्य महोत्सव वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# कार्यालय देगलूर नगर परिषद जि.नांदेड

फोन नं.(०२४६३) २५७६२४ फॅक्स नं.(०२४६३) २५५७७७ E-Mail codegloor@gmail.com

## जाहीर आवाहन

सर्व नागरिक, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, संस्था व गणेशभक्त यांना कळविण्यात येते की, गणेशोत्सव-२०२६ हा पर्यावरणपूरक व प्रदूषणमुक्त वातावरणात साजरा करण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ (Solid Waste Management Rules,2026), पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६, तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) आणि राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

**सर्वांनी पुढील बाबींचे काटेकोरपणे पालन करावे :**

१. मूर्तीः शाडूच्या मातीची मूर्तीच स्थापन करा. पीओपी (PoP) ला पूर्णपणे टाळावे.
२. विसर्जनः घरगुती किंवा नगरपरिषदेच्या कृत्रिम कुंडातच विसर्जन करा. सार्वजनिक जलस्त्रोत स्वच्छ ठेवा.
३. सजावटः प्लास्टिक व थर्माकोल वापरु नका. कागद, कापड आणि निसर्गाशी नाते जोडणारे साहित्य वापरा.
४. निर्माल्यः पूजा साहित्य व फुले 'निर्माल्य कलशात'च टाका. खत निर्मितीस मदत करा.
५. ध्वनीः डी.जे. आणि मोठ्या आवाजाला लगाम घाला. पारंपरिक वाद्यांनी उत्सवाचा आनंद द्विगुणित करा.
६. रोषणाईः एल.ई.डी. (LED) दिव्यांचा वापर करुन विज बचत करा. उजेड असावा, वीज वाया जाऊ नये.

नगरपरिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना व प्रशासनास सहकार्य करावे. पर्यावरण संरक्षण, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छ शहराच्या दृष्टीने सर्व नागरिकांनी या सूचनांचे पालन करुन ''स्वच्छ, हरित व प्रदूषणमुक्त गणेशोत्सव'' साजरा करावा.

| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
|---|---|---|
| मा.सौ.विजयमाला बालाजीराव टेकाळे | मा.ॲड.अंकुश सुरेशराव देसाई | मा.श्रीमती निलम कांबळे |
| नगराध्यक्षा | उपनगराध्यक्ष | मुख्याधिकारी |
| नगर परिषद देगलूर | नगर परिषद देगलूर | नगर परिषद देगलूर |



## सायं दैनिक 'नांदेड वार्ता' च्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...!




कचरा व्यवस्थापन एक सामाजिक बांधिलकी

# स्वच्छ व सुंदर नांदेडसाठी कटिबद्ध



जो कुजतो तो ओला कचरा

खरकटे अन्न,
वाळलेले गवत,
भाज्यांची देठं,
फळांच्या साली,
नारळाची करवंटी,
गव्हाचा कोंडा, शिळं अन्न,
आंब्याची कोय इ.

जो कुजत नाही तो सुका कचरा

रबर, पाईप, ब्लेड,वायर,
स्ट्रॉ, सीडी, चष्मा,बल्ब,
प्लास्टीक पिशवी, लोखंड,
रिकाम्या बाटल्या,फाईल,
बॅटरीचा सेल,रिकामे खोके इ.

सप्रेम नमस्कार,

सर्व नांदेडकरांना याद्वारे नम्रपणे आवाहन करण्यात येते की, आपलं नांदेड स्वच्छ नांदेड या संकल्पनेतून आपणास एक पाऊल चालायचे आहे. ते म्हणजे आम्ही अमृत इंटरप्राइजेस कंपनी द्वारे कचरा व्यवस्थापनासाठी आपल्या दारापर्यंत पोहचणार आहोत.

आपल्याला फक्त ओला आणि सुका कचरा वेगळा जमा करुन घंटा गाडीमध्ये द्यायचा आहे. आपल्या या सहकार्यामुळे एक मोठा बदल होवू शकतो. आपले शहर सुंदर होण्यासाठी हातभार लागू शकतो म्हणून आपणास अमृत इंटरप्राइजेस कंपनी द्वारे विनंती आहे की, आतापासून ओला आणि सुका कचरा वेगळा जमा करुन घंटागाडीमध्ये देणे, या स्वच्छतेच्या कार्यास हातभार लावावा...

नोट : ओला आणि सुका कचरा वेगळा करण्यासाठी सरकार सक्तीचे पाऊल उचलणार आहे, परंतू **अमृत इंटरप्राजेस** कंपनी आपणास सामाजिक बांधिलकी आणि जबाबदारी म्हणून शहर स्वच्छतेसाठी विनंती करीत आहे. तात्काळ तक्रार निवारण करण्यासाठी २४ तासात कधीही तक्रार दाखल करु शकता.

कधीही तक्रार दाखल करु शकता.


# अमृत इंटरप्राइजेस

स्वीमिंग पूल, विसावानगर, नांदेड

| Cell : 7am to 7pm | Cell : 7pm to 7am |
|---|---|
| 8552828321 | 9049432206 |
| 9527349555 | 9096820003 |

नांदेड एज्युकेशन सोसायटीचे

# पीपल्स कॉलेज, नांदेड



मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन व
दैनिक नांदेड वार्ताच्या वर्धापन दिनानिमित्त

## हार्दिक शुभेच्छा...!

**शुभेच्छुक**



| | | | | |
|---|---|---|---|---|
| सी.ए.(डॉ.) प्रविण पाटील | ॲड.प्रफुल्ल अग्रवाल | प्रा.सौ.श्यामल पत्की | ॲड.प्रदिप नागापूरकर | डॉ. विकास सुकाळे |
| अध्यक्ष, नां.ए.सो., नांदेड | उपाध्यक्ष,नां.ए.सो.,नांदेड | सचिव,नां.ए.सो.,नांदेड | सहसचिव,नां.ए.सो.,नांदेड | प्राचार्य,पीपल्स कॉलेज,नांदेड |

**७५ वर्षांची गौरवशाली परंपरा असलेले व गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण देणारे महाविद्यालय म्हणून लौकिक**

- ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक स्वामी रामानंद तीर्थ यांनी 'शिक्षणातून राष्ट्रउभारणी' हे ध्येय ठेवून केलेली स्थापना
- पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक बांधिलकी, गुणवत्तापूर्ण शिक्षण, साधनसुचिता, त्याग व सामाजिक पाठबळातून स्वावलंबनाची घट्ट झालेली वीण व डॉ. व्यंकटेश काब्दे, कै.सदाशिवराव पाटील यांच्या त्यागी व समाजशील नेतृत्वाखाली गौरवशाली वैभवाची व मूल्यांची निष्ठापूर्वक जपवणूक
- संस्थेचे अध्यक्ष सी.ए.(डॉ.) प्रवीण पाटील, उपाध्यक्ष श्री. प्रफुल्ल अग्रवाल, सचिव प्रा.श्यामल पत्की, सहसचिव ॲड. प्रदिप नागापूरकर व कार्यकारिणी सदस्य श्री. नौनिहालसिंघ जहागिरदार, ॲड.चिरंजीलाल दागडीया, ॲड. प्रदीप नागापूरकर, डॉ. उमेश भालेराव व कु. शांभवी साले यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेजमध्ये नवनवीन योजना राबविण्यात येत आहे.
- आंतरराष्ट्रीय किर्तीचे तत्वज्ञ डॉ. सुरेंद्र बारलिंगे, भाषा, वाङ्मय व समीक्षेच्या क्षेत्रातील विचारवंत डॉ.के.र. शिवरवाडकर, डॉ.स.रा. गाडगीळ, नरहर कुरुंदकर, थोर समाजसेवक व स्वातंत्र्य सैनिक डॉ.ताराबाई परांजपे, ८३ व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्ष व प्रसिध्द साहित्यिक दत्ता भगत, प्राचार्य जे.के. येवतीकर, महाविद्यालयात डिजीटल क्रांती घडवून गुणवत्तेची सर्व मानके पार करून महाविद्यालयाच्या विकासात भर घातलेले प्राचार्य डॉ.व्ही.एन. इंगोले व डॉ.आर.एम.जाधव अशा अनेक नामवंत प्राचार्यांमुळे प्राप्त झालेला लौकिक.
- ६ विषयात पीएच.डी संशोधन केंद्र, २७ संशोधन मार्गदर्शक प्राध्यापक
- यु.जी.सी. च्या दोन फेजमध्ये कॉलेज विथ पोटेंशियल फॉर एक्सलंस दर्जा, उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा महिला सक्षमीकरण पुरस्कार अशी शिक्षणातील अनेक मानके पूर्ण केलेले महाविद्यालय म्हणून नावलौकिक.
- संगणक प्रयोगशाळा, भाषा प्रयोगशाळा, ICT Conference Hall, INFLIBNET, e-Resources इत्यादी सुविधा
- राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, क्रिडा, सांस्कृतिक उपक्रम, स्पर्धा परीक्षा इत्यादी माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास
- अत्याधुनिक सर्व सोईयुक्त नरहर कुरुंदकर सभागृह, उत्कृष्ट व समृध्द ग्रंथालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वातानुकूलित अभ्यासिका, भव्य क्रिडांगण १०० मुली व १०० मुलांची वसतीगृहात राहण्याची सोय

